कृषीवल
रायगड, सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६
किंमत ४ ₹

## मविआचा चहापानावर बहिष्कार

**मुंबई :** राज्य विधीमंडळाचं उद्यापासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होत आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने सरकारने आज चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला. पण या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी नित्य नियमाने बहिष्कार टाकला आहे. महाविकास आघाडीकडून सरकारला पत्र पाठवून चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. महाविकास आघाडीकडून त्यामागील कारणही पत्राद्वारे सांगण्यात आले आहे. महाविकास आघाडीने राज्य सरकारला १५ प्रश्न विचारले आहेत. पान २ वर

रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची किंवा मुलाची आवश्यकता आहे.
ठिकाण : सासवणे
संपर्क: +91 9607102357

### अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा

# पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाला 'अ+' श्रेणी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

राज्यातील शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे योग्य मापन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्रद्वारे राबविण्यात आलेल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा प्रक्रियेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यातील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, वेश्वी या कनिष्ठ महाविद्यालयाने अ+श्रेणी प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे.




> राज्यातील शाळांची गुणवत्ता जागतिक दर्जाची व्हावी, यासाठी SQAAF आराखडा तयार करण्यात आला आहे. या पारदर्शक प्रक्रियेमुळे शाळांना आपल्या उणिवा दूर करून प्रगती करण्याची संधी मिळत आहे.
> – प्रशासकीय प्रतिनिधी, SCERT पुणे.

राज्यातील १.०२ लाख शाळांचे स्वयं-मूल्यांकन महाराष्ट्र राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाच्या वतीने राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांचे मूल्यांकन करण्यात आले. सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात राज्यातील १,०२,६७५ शाळांनी scert-data.web.app या लिंकवरून आपले स्वयं-मूल्यांकन पूर्ण केले होते.

**बाह्य मूल्यांकनाची कठोर प्रक्रिया** स्वयंमूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळांपैकी, २०२५-२०२६ या वर्षात १०,७२१ शाळांची निवड बाह्य मूल्यांकनासाठी करण्यात आली होती. यापैकी १०,६४४ शाळांचे मूल्यांकन प्रत्यक्ष पडताळणीद्वारे पूर्ण करण्यात आले. या अत्यंत चुरशीच्या आणि निकोप प्रक्रियेत राज्यातील केवळ ४२९ शाळांना अ श्रेणी प्राप्त झाली आहे. प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने विशेष यश मिळविले आहे. अ+ श्रेणी पान २ वर

# खासगी रुग्णालये रडारवर

**| रायगड | प्रतिनिधी |**

गेल्या तीन वर्षांत राज्यात जन्मजात व्यंग्य हे पहिल्या पाच प्रमुख बालमृत्यूंच्या कारणांपैकी एक म्हणून समोर आले आहे. जन्मजात व्यंगामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी व गर्भातील जन्मजात व्यंग शोधण्यासाठी ॲनॉमली स्कॅन तपासणी आवश्यक असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केले आहे. विभागाने सर्व खासगी रुग्णालयांना याबाबत निर्देश दिले आहेत.


आरोग्य विभागाने २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ (ऑक्टोबर २०२५ पर्यंत) राज्यातील बालमृत्यूंचे विश्लेषण केले. याचा बालमृत्यू विश्लेषण व विश्लेषण अहवाल आरोग्य विभागाने तयार केला आहे. त्यानुसार, राज्यात गेल्या तीन वर्षांत जन्मजात व्यंग हे बालमृत्यूच्या पहिल्या पाच प्रमुख बालमृत्यूंच्या कारणांपैकी एक असल्याचे निष्पन्न झाले. राज्यात गेल्या तीन वर्षांत झालेल्या बालमृत्यूंपैकी सुमारे ६.५ टक्के जन्मजात व्यंगामुळे झाले आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने गर्भातील जन्मजात व्यंग तपासण्यासाठी केले जाणारे ॲनॉमली स्कॅन आवश्यक असल्याच्या सूचना केल्या आहेत.

आरोग्य विभागाने याबाबतचा शासन निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार, गर्भवतींचे ॲनॉमली स्कॅन १८ ते २० आठवड्यांच्या कालावधीत करावे. ही तपासणी सर्व सरकारी रुग्णालयात २०२४-२५ पासून मोफत करण्यास सुरूवात झाली. गर्भवतींचे ॲनॉमली स्कॅन करण्यासाठी सर्व सरकारी रुग्णालयात आवश्यकतेनुसार सोनोग्राफीची सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यातून जन्मजात व्यंग घेऊन जन्माला येणाऱ्या अर्भकांचे प्रमाण कमी झाले. पान २ वर

### गर्भवतींची तपासणी करण्याचे आदेश

**ॲनॉमली स्कॅन म्हणजे काय?**

ॲनॉमली स्कॅन ही गर्भवतींची नियमित सोनोग्राफी तपासणी असते. ही गरोदरपणाच्या १८ ते २२ व्या आठवड्यात केली जाते. या तपासणीत गर्भातील व्यंग तपासले जाते. त्यात गर्भाची रचना, त्याच्या अवयवांचा विकास आणि एकूण वाढ या बाबी तपासल्या जातात. गर्भाच्या मेंदू, हृदय, हाडे अथवा आणि अवयवांची तपासणीही यात केली जाते.



### जन्मजात व्यंगामुळे होणारे बालमृत्यू रोखणार

**असे असणार नियम**

- सर्व गर्भवतींची १८ ते २० आठवड्यांच्या कालावधीत तपासणी करावी.
- गर्भवती व तिच्या कुटुंबीयांचे समुपदेशन करून त्यांना तपासणीस प्रवृत्त करावे.
- ॲनॉमली स्कॅनचा खर्च गर्भवतीच्या कुटुंबियांकडून घ्यावा.
- या तपासणीसाठी सरकारकडून खासगी रुग्णालयांना अनुदान मिळणार नाही.
- तपासणी करताना लिंगनिदान नियमांचे उल्लंघन करू नये.
- गर्भात व्यंग आढळून आल्यास गर्भपातासाठी समुपदेशन करावे.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

तालुक्यातील एका लॉजवर एका विद्यार्थिनीला आणून तिच्या इच्छेविरूध्द संबंध ठेवल्याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी आरोपीला नाशिक येथून अटक करून महाड न्यायालयासमोर हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

महाड तालुक्यातील एका तरूण विद्यार्थिनीला दि.२१ डिसेंबर २०२४ पासून दि.१४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान लग्नाचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरुध्द पोलादपुर, महाड, ठाणे तसेच नाशिक येथील लॉजवर वेळोवेळी नेवून जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवले. त्यातुन पीडित तरूणी गरोदर राहिली असतानादेखील तिच्यावर जबरदस्तीने शारिरीक संबंध केले.

याप्रकरणी पीडित तरूणीने स्वत: तरूणाविरूध्द पोलादपूर पोलीस ठाण्यात येऊन हे.कॉ.सुतार यांच्याकडे फिर्याद दाखल केल्यानंतर आरोपी पान २ वर

### मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरण

## ठेकेदार कंपनीच्या कर्मचाऱ्याला मारहाण

**११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर व माणगाव बायपासचे काम एल. एन. ए. इन्फा प्रोजेक्ट प्रायवेट लिमिटेड कंपनी करते. या कंपनीच्या कर्मचाऱ्याला मारहाण झाल्याची घटना शनिवारी (दि. २१) घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार पवनकुमार गोवर्धनसिंह खिचड, (वय ३३ वर्ष) हे नाणोरे गावच्या हद्दीतील एल. एन. ए. इन्फा प्रोजेक्ट प्रायवेट लिमिटेड येथील कॉन्फरस हॉलमध्ये एकटेच बसले होते.

त्यावेळी आरोपी योगेश लाड व त्याच्या सोबत ९ ते १० इसम तक्रारदार यांची पूर्व परवानगी न घेता कॉन्फरन्स हॉलमध्ये आले. मुंबई गोवा हायवे रोडचे इंदापुर बायपास ते माणगाव बायपासचे काम चालु ठेवण्यासाठी व खडी क्रशर करीता ब्लास्टींग करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे महिन्याला तीन लाख रुपये खंडणीची मागणी केली असता, त्यावेळी पवनकुमार यांनी खंडणी देण्यास नकार दिला.

आरोपी योगेश लाड व त्याच्या सोबत ९ ते १० लोकांनी कार्यालयामध्ये तसेच कार्यालयाच्या बाहेर तक्रारदार यांना शिवीगाळ करुन मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच झालेल्या झटापटीमध्ये तक्रारदार याचे गळ्यातील सुमारे ८ तोळे वजनाची सोन्याची चेन व शर्टच्या वरच्या खिशातील पान २ वर



## निवडक



### खांदेश्वर सरोवरात स्वच्छता मोहीम

पनवेल : खांदा वसाहत सेक्टर दोन येथील खांदेश्वर सरोवर परिसरात विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. संत समागम बाबा संस्था आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत संत समागम संस्थेचे पाचशेहून अधिक स्वयंसेवक तसेच पन्नासहून अधिक पालिका कर्मचारी सहभागी झाले होते. स्वच्छता व आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. तसेच सामाजिक कार्यकर्ते भीमराव पवार यांनीही उपस्थित राहून स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिले. सरोवर परिसरातील कचरा, प्लास्टिक व जलवनस्पती काढून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. काही तासांच्या परिश्रमानंतर सरोवर परिसर स्वच्छ व निटनेटका झाल्याचे पाहायला मिळाले. या उपक्रमामुळे स्वच्छ सरोवर, निरोगी परिसर हा संदेश देण्यात आला असून नागरिकांनी अशा मोहिमा नियमित राबविण्याची मागणी केली आहे.



### तळा केंद्रावर दहावीची परीक्षा सुरू

**तळा :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली आहे. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो म वेदक विद्यामंदिर तळा केंद्र क्रमांक ७८६१ दहावी फेब्रुवारी- मार्चची बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व शांत वातावरणात पार पडत आहे. राज्यातील एकूण १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. राज्यात ९ हजार ७८८ दिव्यांग विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. महाराष्ट्रातील एकूण ५ हजार १११ मुख्य केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य काटेकोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तळा केंद्रावर तालुक्यातील ९ शाळांचे २२७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. तळा केंद्रावर केंद्र संचालक म्हणून महादेव लोकरे, केंद्र उपसंचालक ए. आर. मुलाणी, स्टेशनरी सुपरवायझर प्रसाद सुतार, लेखनिक किरण सातांबेकर तर शिपाई म्हणून प्रकाश जाधव काम पाहत आहेत. सर्व वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे लावून ही परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त, शांतता, पोलीस बंदोबस्त व बैठे पथकांच्या उपस्थितीत पार पडत आहे. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स केंद्र बंद ठेवणे, संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करणे आदी सूचना देण्यात आल्या आहेत.

# श्रीवर्धनमध्ये पाणी योजनांची रखडपट्टी

## ■ स्थानिक अडचणी, वाढीव खर्च व चुकीच्या तांत्रिक आराखड्यांमुळे ग्रामस्थांचे हाल

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

केंद्र सरकारच्या हर घर जल या घोषणेखाली राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशनची श्रीवर्धन तालुक्यात दयनीय अवस्था झाली आहे. प्रशासनाच्या नोंदीनुसार तालुक्यातील ६६ योजनांपैकी ३८ योजना १०० टक्के पूर्ण झाल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात उर्वरित २८ गावांमध्ये योजना विविध टप्प्यांवर रखडली आहे. अनेक ठिकाणी टाक्या उभ्या, पाइपलाइन टाकलेल्या पण नळातून पाण्याचा थेंबही येत नाही, अशी परिस्थिति आहे.

केंद्र सरकारने हर घर जल या घोषणेखाली प्रत्येक गावात पाइपलाइनचे काम हाती घेतले आहे. परंतु



श्रीवर्धनमधील २८ गावांमध्ये ही योजना विविध कारणांमुळे रखडली आहे. ही योजना रखडण्याचे मुख्य कारण चुकीचे तांत्रिक प्रस्ताव हे आहे.

अनेक गावांत पाण्याचा स्रोत निश्चित न करताच विहिरी खोदल्या गेल्या. यामुळे काही दिवसांतच त्या कोरड्या पडल्या. काही ठिकाणी पायाभूत सुविधा तयार आहेत, परंतु पंप बसवणे किंवा वीजजोडणीमुळे पाणीपुरवठा प्रलंबित आहे. तसेच पावसाळ्यात कामे बंद राहणे आणि उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासणे या दुष्टचक्रात ही योजना अडकली आहे.

कामांच्या विलंबामुळे प्रकल्प खर्च वाढल्याची चर्चा असून, अंदाजपत्रकापेक्षा अधिक निधीची गरज भासत आहे. दरम्यान, अनेक नळ योजनांमध्ये तांत्रिक त्रुटी राहिल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. पाण्याच्या स्रोतांची अपुरी तपासणी, अंदाजपत्रकातील विसंगती आणि प्रत्यक्ष भौगोलिक परिस्थितीशी विसंगत आराखडे यामुळे काही योजना सुरुवातीपासूनच अडचणीत आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तर काही गावांत पूर्ण नोंद असूनही वितरण व्यवस्था सुरू नसल्याचे नागरिकांनी म्हटले आहे. कागदोपत्री पूर्ण दाखविल्या जाणाऱ्या योजनांबाबतही नाराजी व्यक्त केली जात आहे.

### योजना रखडलेली २८ गावे

कुडकी, साखरोणे, कोलमांडले, कापोली, कार्ले, गाळसुरे, भट्टीचा माळ, वडवली, बापवन कांडणे, वेळास, जसवली, खरगाव, कोंढेपंचतन, आदगाव कुणबीवाडी, आराठी, कुडगाव, पांगळोली, वडघर, धनगरमलई, भरडखोल, बोलीपंचतन, दांडा, दिघी, हरवीत, मारल देवघर, काळिंजे, कुरवडे .

### निधीअभावी रखडल्या योजना

काळिंजे, मारल आणि कुरवडे या योजना स्थानिक ग्रामपंचायत अडचणींमुळे रखडल्या आहेत. तर इतर योजना या निधीअभावी रखडल्या आहेत. आम्ही वरिष्ठ पातळीवर सुधारित आराखडा देऊन अधिक निधीची मागणी केली आहे. त्यानुसार उर्वरित कामे लवकर करू, अशी माहिती ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या उपाभियंता शेफाली देशमुख यांनी दिली.

## वाघ्रण तंटामुक्त गाव समितीची सभा संपन्न

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत वाघ्रणच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिति वाघ्रणची सभा १९ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाली.

जयश्री भोईर यांनी केलेल्या तक्रारी संधर्भात सायंकाळी ४ वाजता या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रथम पत्रकार तंटामुक्त गाव समिति उपाध्यक्ष दीपक यशवंत पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले तसेच विशेष सूचना देऊन सभा सुरू केली. यावेळी पक्षकार बंदीनी पाटील उपस्थित होत्या. सरपंच व अध्यक्ष राजेंद्र हरिश्चंद्र पाटील यांनी अर्ज वाचन केले.

एक लाख एकावन्न हजार रकमेचा वाद होता. दोन्ही बाजू ऐकून सदस्य बाळकृष्ण पाटील, दयानंद म्हात्रे, पोलीस पाटील सोनल पाटील आदीं सोबत चर्चा झाली आणि न्याय झाला. दोन्ही पक्षकारांना न्याय पटल्यावर दप्तरी नोंद करून तंटामुक्त गाव समिति संस्थापक सदस्य आणि उपाध्यक्ष पत्रकार दीपक पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून कामकाज संपवले. निमंत्रक म्हणून सारीका पाटील यांनी काम पाहिले

## श्रणव यादव यांची कलाक्षेत्रात गगन भरारी

**महाड :** महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात श्रणव संतोष यादव याने मूलभूत विभाग यामध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कलेची चमक राज्यपातळीवर दाखवून दिली आहे. लहानपणापासूनच चित्रकलेची आवड



जोपासणाऱ्या श्रणवने दुर्गम अशा ग्रामीण खेडेगावातून पुढे येत आपल्या कलेतून सामाजिक विषय, निसर्गचित्रण आणि भावविश्व यांचे प्रभावी दर्शन घडवले आहे. त्याच्या सर्जनशीलतेचे कौतुक होत आहे.

## हमरापुर येथे जल्लोष सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील हमरापुर येथे जल्लोष २०२६ सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद शाळा हमरापूर येथे करण्यात आले होते.

ग्रामपंचायत हमरापूर यांच्यावतीने शिवजयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमास हमरापुर ग्रामपंचायत सरपंच राकेश दाभाडे, उपसरपंच सायली मांडलेकर, माजी सरपंच रवींद्र शेजवळ, युवराज म्हात्रे, ओंकार पाटील, ग्रामपंचायत सदस्य भाग्यश्री पाटील, पूजा पाटील, पायल सुर्वे, तसेच राजिप



शाळेचे मुख्याध्यापक विठोबा पाटील, शिक्षिका मंदाकिनी म्हात्रे, सुनंदा खाडे, सर्व सदस्य व कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गावातील लहान विद्यार्थी, विद्यार्थिनींनी मराठी व हिंदी गीतांवर अप्रतिम नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. सर्व स्पर्धकांना सरपंच राकेश दाभाडे, मुख्याध्यापक विठोबा पाटील व सदस्यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद शाळा हमरापूर, शाळा व्यवस्थापन समिती शाळा हमरापूर, ग्रामस्थ मंडळ हमरापूर, माजी विद्यार्थी संघ शाळा हमरापूर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन राजिप शाळेचे मुख्याध्यापक विठोबा पाटील यांनी केले.

## महाराजस्व अभियानाचा जनतेने लाभ घ्यावा

### आदेश डफळ यांचे प्रतिपादन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न सत्वर निकाली काढणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या नवीन तरतुदींची जनजागृती करणे, प्रभावी अंमलबजावणी करणे, डिजिटल सेवांचा जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करणे, नगर परिषद, नगर पंचायत पातळीवर छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.१ राबविण्याबाबत शासन निर्णय घेण्यात आला आहे. तरी या शिबिराचा विद्यार्थी, नागरिक व महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार आदेश डफळ यांनी केले आहे.

शासनाच्या महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्याबाबतचा निर्णय शासनाने निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.१ अंतर्गत खालील वेळापत्रकानूसार तालुक्यात एक दिवसीय समाधान शिबिराचे महसूल मंडळ स्तरावर आयोजन करण्यात येणार आहे.

## अतिक्रमणाचा विळखा

**पनवेल :** नियोजनबद्ध शहर असणाऱ्या खारघरमध्ये रस्त्यालगतच्या मार्जिनल स्पेसवर व्यापाऱ्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालण्याची वेळ आली आहे. नवरंग सर्कल- शिल्प चौक, अतिरिक्त काउंटर, मालाचे रॅक आणि अनधिकृत स्टॉल उभारून सार्वजनिक जागेचा व्यापारी वापर सुरू असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप होत आहे.

## वनसमितीच्या माध्यमातून स्वच्छता राखण्यास मदत

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान नगरपरिषदेच्या सत्ताधारी गटाच्या माध्यमातून वन संरक्षण समिती कार्यरत असते. सत्ताधाऱ्यांच्या मर्जीतील कार्यकर्ते या समितीवर उत्तम प्रकारे विकास कामे करण्यासाठी नेहमीच सज्ज असतात.

दस्तुरी वाहन पार्किंगच्या माध्यमातून लाखो रुपयांचे उत्पन्न या समितीला प्राप्त होते. काहीवेळा वृक्षारोपण, ठराविक पॉईंट्सची सुरक्षा व्यवस्था, कचराकुंडी लावणे अशी महत्वपूर्ण कामे समितीचे पदाधिकारी, सदस्य करीत असतात. लाखो रुपयांची शिल्लक आजही जमा असल्याने यावेळी गावातील एकूण पाच गरजवंत महिलांना स्वच्छता कामे दिली आहेत. यापुढे नव्याने स्थापन होणाऱ्या समितीवर बारकाईने लक्ष केंद्रित करून गावाच्या हिताच्या दृष्टीने लाखो रुपयांची शिल्लक रक्कम आहे त्याचा सदुपयोग विकास कामांसाठी करावा, अशी मागणी होत आहे.

## उरण तालुक्यातील गावांना बसणार पुराचा वेढा

**। उरण । प्रतिनिधी ।**

विकासकांनी वेश्वी, चिर्ले व धुतूम ग्रामपंचायत हद्दीत मुरुम, माती, दगड आणि डेब्रिजचा भराव टाकून पावसाळ्यातील नैसर्गिक स्रोत तसेच खाडी किनारा बुजून टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे रहिवाशांच्या घरात यावर्षीच्या पावसाळ्यातील पुराचे पाणी शिरण्याचा धोका निर्माण होणार आहे.तसेच आरोग्याला घातक असणाऱ्या डेब्रिजमुळे या परिसरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार असल्याची भीती रहिवाशी व्यक्त करत आहेत.

अटल सेतू, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळे उरण तालुक्यातील वेश्वी चिर्ले व धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील गावांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.त्यामुळे राजस्थान, गुजरात आणि इतर शहरातील विकासकांनी सिडको व महसूल विभागाला हाताशी धरून याठिकाणच्या शेतजमीनी संपादित करण्याचा घाट घातला आहे. या परिसरातील जमिनीवर अनाधिकृत रात्री अपरात्री मुरुम,माती,दगड आणि डेब्रिजचा भराव टाकून पावसाळ्यातील नैसर्गिक स्रोत तसेच खाडी किनाऱ्यावरील खारफुटीची वने नष्ट करुन बुजून टाकण्यास सुरुवात केली आहे. उरणचे तहसीलदार डॉ उध्दव कदम यांनी नुकताच याठिकाणच्या परिसराची व सुरु असणाऱ्या भरावाची पाहणी शेतकऱ्यांच्या उपस्थितीत केली होती.परंतु बदलीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी आर्थिक हितसंबंध जोपासत संबंधित विकासकांना अभय देण्याचा प्रयत्न केला आहे.एकंदरीत प्रशासनाच्या नियोजनशून्य व भ्रष्ट कारभारामुळे उरण तालुक्यातील वेश्वी चिर्ले व धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांच्या घरात यावर्षीच्या पावसाळ्यातील पुराचे पाणी शिरण्याचा धोका निर्माण होणार आहे.तसेच आरोग्याला घातक असणाऱ्या डेब्रिजमुळे या परिसरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार असल्याची भीती रहिवाशी व्यक्त करत आहेत.

## पळसदरी-कर्जत प्रवास धोकादायक

### ■ समन्वयाचा अभाव असल्याने रस्ता रखडला

### ■ महिन्याला किमान एक अपघात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पळसदरी मार्गे कर्जतला जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्याचे काम गेल्या सात वर्षांपासून रखडल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. शेतकऱ्यांना जमीन संपादनाचा मोबदला न मिळाल्याने वारणे, अंजरूण, नावंढे व हाळ परिसरात काम थांबले असून अपूर्ण भागात रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. मोठमोठे खड्डे, अचानक दोन मार्गिकेचा रस्ता एकमार्गी होणे तसेच रात्री रस्त्याचा अंदाज न आल्याने वारंवार अपघात घडत आहेत. महिन्याला किमान एक जीवघेणा अपघात होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

राष्ट्रीय महामार्ग ५४८ अंतर्गत असलेल्या या मार्गाचे बहुतांश काम पूर्ण झाले असले तरी उर्वरित भागात पूर्वीचा डांबरी रस्ताही उखडला गेला आहे. नावंढे परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे बाजूपट्टीवर माती साचून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शेतकरी किरण हाडप यांनी, वडिलोपार्जित जमीन गेली; मात्र मोबदला मिळालेला नाही, अशी नाराजी व्यक्त केली.

मोबदला कोणत्या विभागाने द्यायचा याबाबत निर्णय प्रलंबित असल्याचे एमएमआरडीचे निवासी अभियंता उमेश माने यांनी सांगितले.

### मोबदला प्रलंबित; कामाला ब्रेक

शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा प्रश्न सुटला नसल्याने रस्त्याचे काम थांबले आहे. संबंधित विभागांरध्ये समन्वयाचा अभाव असल्याने प्रकल्प रखडला असून प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने निर्णय घेतल्यास अपघातांची मालिका थांबू शकते, अशी मागणी होत आहे.

पान १ वरून

## मविआचा चहापानावर बहिष्कार

त्यामुळे आगामी अधिवेशन हे विरोधकांच्या आक्रमणाने गाजणार असल्याचे संकेत मिळत आहे.

महाविकास आघाडीने अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेवर संशय व्यक्त केला आहे. सरकारला पाठवलेल्या पत्रात याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे पुरोगामी विचारांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघात की घातपात याबाबत महाराष्ट्रात संशय आहे. यातून अनेक प्रश्ननिर्माण झाले आहे याबाबत सरकारची संदिग्ध भूमिका आहे, असा आरोप मविआने पत्रात केला आहे.

विरोधी पक्ष जे मुद्दे उपस्थित करतो, विरोधी पक्ष जे मुद्दे उपस्थित करतात त्यावर कार्यवाही होत नाही. मंत्री नरहरी झिरवाळ, संजय शिरसाठ, योगेश कदम यांच्यावर आरोप झाले तरी सरकारने कारवाई केली नाही. हे सरकार विरोधकांच्या आरोपाची दखल घेत नाही. भ्रष्टाचाराला पाठीशी घालत आहे, असा आरोप मविआने पत्रात केला आहे.

मंत्र्यांच्या दालनात थेट लाच घेण्याचे प्रकरण समोर आले आहे. अन्न आणि प्रशासन विभागात कर्मचारी लाच घेताना पकडला गेला आहे. एक लाइन, दोन लाइन, तीन लाइन, भ्रष्टाचाराची लाइन वाढली आहे. महायुती सरकारच्या काळात मंत्रालया लक्ष्मीदर्शन जोरात सुरू आहे, अजितदादांच्या निधनानंतर शासकीय दुखवट्याच्या काळात ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्यात आला. यामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचा संशय आहे. शाळांना चुकीच्या पद्धतीने अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेल्या प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी पत्रात करण्यात आली आहे.

घटनात्मक पदावरील असलेली घटनात्मक कर्तव्याच्या बाहेर जाऊन घटनाबाह्य कृती करतात. नियम आणि संकेत धाब्यावर ठेवून सत्ताधाऱ्यांच्या जीवावर लोकशाही मूल्यांचा भंग करतात. विधानसभेचे अध्यक्ष हे जमीन मोजणी साठी उतरतात निवडणुकीवेळी गृहखात्यात हस्तक्षेप करून संरक्षण काढून घेणे अशा घटना समोर आल्या आहेत, असा आरोप पत्रात करण्यात आला आहे.

गतवर्षी खरीप हंगामात अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप एक रुपयाही मिळाला नाही. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जानेवारीपर्यंत मदतीचे दिलेले आश्वासनही हवेतच विरले आहे. नुकसानीनंतर सहा महिने उलटले तरीही शेतकऱ्यांना दिलासा मिळाला नाही. त्यामुळे पीकविमा योजना शेतकऱ्यांसाठी आहे की, कंपन्यासाठी, असा प्रश्न उपस्थित होतो. कृषिमंत्री यांनी जानेवारीपर्यंत मदत वितरीत करण्याची ग्वाही दिली होती, प्रत्यक्षात नुकसानीनंतर सहा महिने उलटले तरीही एका रुपयाचीही मदत झाली नाही, अशी टीका पत्रात करण्यात आली आहे.

## खासगी रुग्णालये रडारवर

मात्र, राज्यातील एकूण प्रसूती व प्रसूतीपश्चात सेवांपैकी ५० टक्के सेवा खासगी रुग्णालयात दिल्या जातात. त्यामुळे खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गर्भवती ॲनॉमली स्कॅनपासून वंचित राहू नयेत, याची खबरदारी खासगी रुग्णालयांनी घ्यावी. सर्व रुग्णालयांनी ही तपासणी करावी. गर्भात जन्मजात व्यंग राहिल्यास गर्भपात करण्यासाठी गर्भवतीचे समुपदेश रुग्णालयाने करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाला अ+ श्रेणी

मिळवणाऱ्या या निवडक शाळांमध्ये अलिबागच्या वेश्वी येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या उत्कृष्ट सोयी-सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर थेट अ+ मानांकन मिळवले आहे. या यशामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यातून महाविद्यालयावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या यशामुळे अलिबागच्या शैक्षणिक क्षेत्रात प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीने आपला दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळत असल्याचे या मूल्यांकनातून स्पष्ट झाले आहे.या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. आ. जयंत पाटील, संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, खजिनदार नृपाल पाटील यांनी कॉलेजचे प्राचार्य रविंद्र पाटील, संचालक विक्रांत वार्डे, उपप्राचार्य निशिकांत कोळसे इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

## ठेकेदार कंपनीच्या कर्मचाऱ्याला मारहाण

२०००० रुपये कोठेतरी पडुन गहाळ झाले.

याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पो. नि. निवृती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स. पो. नि. विजय सुर्वे करीत आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

प्रसाद जिभाऊ नाडेकर याला पोलादपूर पोलिसांनी तातडीने नाशिक येथे जाऊन अटक केली आणि त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश आर. मुंढे यांनी नाशिक येथून आरोपीस ताब्यात घेतले आणि महाड न्यायालयासमोर हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## तळा तालुक्यात शिमगोत्सवास प्रारंभ

**तळा :** कोकणी माणसाच्या जिव्हाळ्याचा सण समजला जाणाऱ्या शिमगोत्सवास रविवार पासून सुरुवात झाली. शिमगोत्सवासाठी चाकरमानी कोकणात आपल्या गावी परततात. रायगड जिल्ह्यात शिमगा म्हणजे जणूकाही दिवाळी दसराच. शिमग्याचे पुढील दहा दिवस होळ्या, ग्रामदेवतेच्या पालखीची लगबग, दर्शनासाठी झुंबड, शंखासुराचा मार, गोमुचा नाच, शिमग्याची सोंग जणूकाही आनंदाची पर्वणीच. फाल्गुन शुद्ध पंचमीला कोकणात शिमगोत्सवाला प्रारंभ झाला आहे. त्या अनुषंगाने तळा तालुक्यात सर्वत्र होळीच्या मैदानावर प्रथम होळी लावण्यात आली.



## गरजूंना ब्लँकेटचे वाटप

**। उरण । प्रतिनिधी ।**

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे कार्य व विचारांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे शिवजयंतीचे औचित्य साधून उरण तालुक्यातील करळ फाटा येथील झोपडपट्टीतील गोरगरीब गरजूंना, नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसचे राजेंद्र भगत यांची उपस्थिती लाभली. राजेंद्र भगत यांच्या शुभहस्ते गोरगरिबांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे सुदेश पाटील, विठ्ठल ममताबादे, कुमार ठाकूर, प्रेम म्हात्रे, माधव म्हात्रे, हेमंत ठाकूर, कृष्णा कोळी, सादिक शेख, साहिल म्हात्रे, घनश्याम पाटील, सचिन म्हात्रे, अभय पाटील, प्रकाश म्हात्रे, नारायण कोळी आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

## निवडक

### हवामानातील बदलामुळे मोहर वाळला

**सुधागड-पाली :** सुधागड तालुक्यातील अनेक ठिकाणी हवामानातील सतत बदलामुळे आंब्याचा मोहर करपल्याचे चित्र दिसून आले आहे. यावर्षी आलेले पीक चांगल्या पद्धतीने होण्याची अपेक्षा होती; मात्र, वातावरणातील अनिश्चिततेमुळे मोहर



वाळल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक बागांमध्ये मोहर जळाल्याने फळधारणेवर थेट परिणाम झाला असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान बरेच झालेले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने काही ठिकाणी पाहणी केली आहे. मात्र शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, केवळ पाहणी पुरेसे नाही तर नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल पाठवणे ही विभागाची जबाबदारी आहे. शासनाच्या निर्देशांनुसार पिक विमा योजनेच्या माध्यमातून योग्य ती नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून जोर धरत आहे. स्थानिक शेतकरी व संघटनांनी कृषी विभागाने तातडीने सर्व नुकसानग्रस्त ठिकाणी पंचनामे करून अहवाल शासनाकडे पाठवावा, जेणेकरून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल, अशी मागणी जोर धरत आहे.

### जितेंद्र नाखवाची गगन भरारी

**उरण :** तालुक्यातील जितेंद्र नाखवा यांना लहानपणापासूनच कष्ट, शिस्त आणि जिद्द यांचे संस्कार त्यांचे आई-वडील रोहिदास नाखवा आणि लीला नाखवा यांच्याकडून मिळाले. त्यांच्या मेहन-तीने आणि प्रामाणिकपणानेच त्याच्या स्वप्नांना दिशा दिली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने हॉटेल इंडस्ट्रीत शेफ म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. स्वयंपाकघरातील घाम, मेहनत आणि शिकण्याची ओढ यामुळे त्याने आपल्या कौशल्याची छाप उमटवली. आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन मिळवण्यासाठी जितेंद्र नाखवा यांनी स्वित्झर्लंडमधील प्रतिष्ठित हॉस्पिटॅलिटी शिक्षण घेतले आणि जागतिक दर्जाचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याने भारतात आणि




परदेशात जगातील नामांकित हॉटेल ब्रँड्ससोबत काम केले. या आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे त्याच्या नेतृत्व कौशल्यात आणि व्यवस्थापन क्षमतेत मोठी भर पडली. सीएमओ अशिया यांच्यावतीने ताज लॅडस् एंड येथे शुक्रवारी (दि.२०)आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात जितेंद्र नाखवा यांना 'अशियाज् मोस्ट एडमायर्ड जनरल मॅनेजर २०२६' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान त्यांच्या २३ वर्षांच्या अथक परिश्रमांची आणि आतिथ्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची पावती आहे. त्यांच्या या यशामूळे उरणचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले आहे.



### नागाव समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

**उरण :** 'प्रदूषण आत असो किंवा बाहेर, दोन्हीही हानिकारक आहेत' हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवत संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन यांच्या माध्यमातून उरण तालुक्यातील नागाव समुद्रकिनारी भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमात लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत जवळपास ६०० स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवत किनारपट्टी स्वच्छ केली. देशभरात रविवारी (दि.२२) 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानांतर्गत जवळपास २ हजार ठिकाणी जलाशय सफाई मोहीम हाती घेण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून उरणमधील नागाव समुद्रकिनारा येथे मोठ्या प्रमाणावर स्वच्छता अभियान पार पडले. मोहिमेदरम्यान प्लास्टिक, काच, थर्माकोल व इतर घनकचऱ्याचा मोठा साठा गोळा करण्यात आला. ही मोहीम संत निरंकारी मिशन अंतर्गत, संत निरंकारी चारिटेबल फाऊंडेशन यांच्या आयोजनातून, सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिताजी यांच्या प्रेरणेने पार पडली.

### वासांबे ग्रामपंचायत राज्यात आठवी

**उरण :** माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करत ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आठवा क्रमांक, तसेच कोकण विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या अभियानात प्रभावी अंमलबजावणी करून वासांबे ग्रामपंचायतीने राज्यस्तरावर आपली ठळक छाप पाडली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांना ५० लाख रकमेचे पारितोषिक प्रदान करण्यात आले आहे. ही कामगिरी खालापूर तालुका व रायगड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. या यशस्वी कामगिरीची दखल घेत महाराष्ट्र राज्याच्या माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते ग्रुप ग्रामपंचायत वासांबे येथील सरपंच उमा मुंडे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, संदीप मुंडे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# श्रीवर्धनमध्ये मायनिंग माफियांचा सुळसुळाट

## ।। बेकायदेशीर ओव्हरलोड वाहतुकीचा कहर ।। प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात राजकीय दलालांच्या वरदहस्तामुळे अनेक ठिकाणी सुरु असलेल्या कथित बेकायदेशीर खाणकामाने भीषण स्वरूप धारण केले आहे. विशेषतः गडबवाडी व करिवणे परिसरातील खाणीतून गालसूरमार्गे बोर्ली ते दिघी या मुख्य रस्त्यावरून ओव्हरलोड डंपरची अविरत वाहतूक सुरू असून स्थानिक नागरिकांचे जीवन अक्षरशः वेठीस धरले गेले आहे. येथील रस्त्यांची दुरवस्था, वाढते अपघात, धुळीचे प्रदूषण, शेतीचे नुकसान आणि प्रशासनाचे कथित दुर्लक्ष यामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

श्रीवर्धनमध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदेशी खाणकाम सुरू आहेत. त्याला राजकीय दलालांचा वरदहस्त असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. त्यामुळे येथील नागरिकांचा जिव धोक्यात आला आहे. गडबवाडी व करिवणे परिसरातील खाणीतून गालसूरमार्गे बोर्ली ते दिघी या मार्गावर डंपरची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असल्यामुळे येथील डांबरीकरण पूर्णपणे उखडले गेले असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. काही भागात रस्ता खचला आहे. पावसाळ्यात चिखल आणि उन्हाळ्यात धुळीचे ढग यामुळे वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वार वारंवार घसरून पडत असल्याच्या घटना घडत आहेत. तसेच, ओव्हरलोड डंपर चढाव चढताना अडकल्याने रस्त्याच्या कडेला माती टाकून कृत्रिम चढ तयार केल्याचा आरोप आहे. त्यामुळे रस्ता अधिक अरुंद झाला असून मातीचे ढिगारे कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. ही कृती पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे सांगितले जात असून सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

रात्री उशिरापर्यंत डंपरची वाहतूक सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वेगमर्यादा पाळली जात नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. काही वाहनांच्या नंबर प्लेट अस्पष्ट असल्याचाही आरोप आहे. त्यामुळे शाळकरी मुले, रुग्णवाहिका आणि शेतकरी अडचणीत आले आहेत. शाळकरी मुलांना धोकादायक वाहतुकीतून प्रवास करावा लागत आहे. रुग्णवाहिकांना वेळेत मार्ग मिळत नसल्याने जीवितास धोका निर्माण होत आहे. धुळीमुळे पिकांवर थर बसून उत्पादन घटत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच, विहिरी व पाण्याचे स्रोत गाळाने दूषित होत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. त्याचबरोबर जड वाहनांच्या कंपनांमुळे रस्त्यालगतच्या घरांना तडे जात असल्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. तसेच, सतत उडणाऱ्या धुळीमुळे दमा, खोकला, ॲलर्जी यांसारख्या आजारांत वाढ झाल्याने वृद्ध आणि लहान मुले विशेषतः त्रस्त आहेत, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

वारंवार तक्रारी, निवेदने आणि बातम्या प्रसिद्ध होऊनही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण आहे. मायनिंग माफियांना नेमके कोण पाठीशी घालत आहे? पोलीस यंत्रणा या प्रश्नावर गप्प का? जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष का? सामान्य जनतेचा वाली कोण? असे संतप्त सवाल करत पोलीस व जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. नागरिकांचा आरोप आहे की, संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई होत नसल्याने संगनमताचा संशय अधिक बळावत आहे.



#### ग्रामस्थांचा इशारा

मोठा अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. ग्रामस्थांनी, अवैध व ओव्हरलोड वाहतूक तात्काळ बंद करावी, कायमस्वरूपी तपासणी नाके उभारावेत, रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, स्वतंत्र चौकशी समिती नेमावी, धुळीवर नियंत्रणासाठी नियमित पाणी फवारणी करावी इत्यादींची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन, रास्ता रोको आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. शासन, पोलीस प्रशासन आणि जिल्हा यंत्रणांनी तातडीने हस्तक्षेप करून या गंभीर प्रश्नावर ठोस पावले उचलणे अत्यावश्यक ठरत आहे. अन्यथा वाढता जनआक्रोश अनावर होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# लिपिक अधिकारी, कर्मचाऱ्यांचा आक्रोश मोर्चा

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय व अधिकारी व कर्मचारी संघटनेने आंदोलनाचे हत्यार उगारले आहे. संघटनेच्या माध्यमातून १६ फ ब्रुवारीपासून निदर्शने तसेच इतर आंदोलन करण्यात येत आह. मात्र, संघटनेच्या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने सोमवारी (दि.२३) संघटनेच्या नेतृत्वाखाली लिपिक अधिकारी व कर्मचारी आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार आहेत. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी किशन जावळे यांना देण्यात आले आहे.



लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दुर करुन सुधारित वेतन श्रेणी लागू करावी. तसेच, जशास तशी जुनी पेन्शन लागू करावी. या मागण्यांसह लिपीक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांना अनेक समस्या भेडसावत आहेत. आपल्या मागण्यांसाठी वेळोवेळी आंदोलन करूनही आश्वासनाच्या पलीकडे काहीही लागले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष धुमसत आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याच्या पूर्ततेसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय व अधिकारी व कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

संघटनेच्यावतीने सोमवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. २३ फेब्रुवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असून, अधिवेशन कालावधीत लिपिक अधिकारी व कर्मचारी असहकार धोरण स्वीकारतील. त्यामुळे शासकीय कामकाजावर परिणाम होईल, याबाबत कर्मचाऱ्यांना जबाबदार धरू नये असेही संघटनेने दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# भाऊंच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात शनिवारी (दि.२१) रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते, शिक्षण महर्षी, स्व. प्रभाकर पाटील (भाऊ) यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गीते, कला विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. पूजा म्हात्रे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी स्व.प्रभाकर पाटील यांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

डॉ. नम्रता पाटील यांनी, जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय विकासामध्ये भाऊंच्या योगदानावर आपले विचार मांडले. यावेळी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गिते, समन्वयक प्रा. मिलिंद घाडगे तसेच सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते.

# शिरवली ग्रा.पं.वर शुभेच्छांचा वर्षाव

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील शिरवली ग्रामपंचायतीला 'माझी वसुंधरा ५.०' या अभियानांतर्गत राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. शिरवलीचे सरपंच महेश पाटील व ग्रामपंचायत अधिकारी यांनी मुंबई येथे २१ फेब्रुवारी रोजी हा राज्यस्तरीय पुरस्कार महामहीम राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते स्विकारला. त्यामुळे लोकनियुक्त सरपंच महेश पाटील यांच्यासह ग्रामविकास अधिकारी, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थांवर शुभेच्छांचा वर्षा होत आहे.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व जतन करण्यासाठी ग्रामपंचायत शिरवली यांनी केलेल्या कामगिरीबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि माझी वसुंधरा अभियान संचालनालय यांचे वतीने हा पुरस्कार देण्यात आला आहे. तर, शिरवली ग्रामपंचायतीला या उपक्रमात बक्षीस मिळावे यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी गणेश जाधव, यशवंत ढमाल, वैजयंती पाटील, जनार्दन पाटील, ऋतुजा जाधव, कृतीका पाटील यांनी प्रचंड मेहनत घेतल्याने यांचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# बेलापूर टेकड्यांवर भूस्खलनाचा धोका

## बांधकामांवर तात्काळ कारवाईची मागणी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

वाढत्या भूस्खलन धोक्याचा इशारा देत सुमारे २०० नागरिक आणि पर्यावरणवादी संघटनांनी रविवारी (दि.२२) सकाळी बेलापूरच्या मुख्य चौकात तिसरी मानव साखळी तयार करण्यात आली. अनियंत्रित आणि कथित बेकायदेशीर बांधकामांपासून संवेदनशील बेलापूर टेकड्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी आपला लढा तीव्र केला.

सेव्ह बेलापूर हिल्स फोरम आणि नॅटकनेक्ट फाउंडेशन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात भूस्खलनप्रवण उतारांवर उभ्या




असलेल्या सुमारे ३० अनधिकृत बांधकामांविरोधातील प्रशासनाच्या दीर्घकालीन निष्क्रियतेचा मुद्दा मांडण्यात आला. सिडकोकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही बांधकामे सुमारे २.३ लाख चौरस फूट सार्वजनिक जागेवर पसरलेली आहेत. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून जमीन सपाट केल्यामुळे टेकडीची माती सैल झाली आहे. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगासमोर दिलेल्या पाडकामाच्या आदेशांनंतरही ही बांधकामे उघडपणे वाढत असल्याचा कार्यकर्त्यांचा आरोप आहे. सिडको मुख्यालयातून स्पष्ट दिसणाऱ्या या टेकड्या आता प्रशासकीय ठप्पपणाचे प्रतीक बनल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत हे तिसरे आंदोलन आहे. एप्रिल २०२४ मध्ये वृक्षउत्पाटनानंतर भूस्खलनाच्या धोक्याकडे लक्ष वेधण्यासाठी आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये आयोगाच्या निर्देशांचे पालन न झाल्याच्या निषेधार्थ मानव साखळी करण्यात आली होती.

# साखरी-मंडणगडची पालखी हरिहरेश्वरमध्ये दाखल

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

फाल्गुन महिन्याच्या आगमनासोबतच कोकण पट्ट्यात शिमगोत्सवाची लगबग सुरू झाली असून गावागावांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. होळीच्या सुमारे १५ ते २० दिवस आधीपासूनच सणाची चाहूल लागते. महिलांकडून ग्रामदेवतेसाठी पारंपरिक ओव्या, भारुडे आणि भक्तिगीते गात प्रार्थना केली जाते. या गायनातून गावाच्या सुख-समृद्धीसाठी साकडे घातले जाते. फाल्गुन पंचमीपासून शिमगो उत्सवाला औपचारिक सुरुवात होते. पंचमीच्या दिवशी पहिली होळी प्रज्वलित केली जाते. त्यानंतर



गावातील 'खेळे' खास पारंपरिक वेशभूषेत सजून घराघरांत जाऊन सादरीकरण करतात. डोक्यावर फेटे, गळ्यात फुलांच्या माळा, हातात पारंपरिक वाद्ये आणि चेहऱ्यावर रंगीबेरंगी रंग अशी त्यांची वेशभूषा आकर्षण ठरते. विशेष म्हणजे हे खेळ अनवाणी सादर करण्याची परंपरा आजही काटेकोरपणे पाळली जाते.

होळीपूर्वी चार ते पाच दिवस खेळांची गावात वर्दळ असते. प्रत्येक घरासमोर ढोल, ताशा, मृदुंग आणि झांजांच्या तालावर पारंपरिक नृत्ये सादर केली जातात. शेजारील गावांमध्येही खेळांची देवाणघेवाण होत असल्याने परिसरात सांस्कृतिक ऐक्याची भावना दृढ होत आहे. होळीच्या दिवशी विधिवत पूजन करून नवस फेडले जातात. दुसऱ्या दिवशी ग्रामदेवतेची पालखी मोठ्या भक्तिभावाने काढण्यात येते. देवाची पालखी गावागावांत फिरवली जाते. गावकरी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत 'ग्रामदेवतेच्या' जयघोषात पालखीचे स्वागत करतात. दरम्यान, शिमगोत्सवानिमित्त रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील साखरी गावातून निघालेली ग्रामदैवताची पालखी मोठ्या भक्तिभावात श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथे दाखल झाली.

# बायोगॅस प्रकल्पाच्या दुर्गंधीने जनता त्रस्त

## संजय भोईर यांचा जनआंदोलनाचा इशारा

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगडच्या कुहिरे गावात रिलायन्स कंपनीच्या बायोगॅस प्रकल्पामुळे सतत तीव्र दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे येथील जनता प्रचंड त्रस्त झाली आहे. या होणाऱ्या तीव्र दुर्गंधीबाबत तात्काळ चौकशी व कठोर कारवाई करण्याबाबत माजी सभापती तथा विद्यमान पेण पंचायत समिती सदस्य संजय भोईर यांनी थेट प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ रायगड विभाग यांच्याकडे तक्रारी अर्ज देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

या अर्जातून संजय भोईर यांनी, येथील प्रदूषण व दुर्गंधीची अत्यंत गंभीर बाब महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांच्या स्पष्टपणे निदर्शनास आणून दिली आहे. जनहितासाठी भोईर यांनी या विषयात विशेष पुढाकार घेऊन आक्रमक पवित्रा घेत जन आंदोलनाचा देखील इशारा दिला आहे. या तक्रारी निवेदनात म्हटले आहे की, शिहू नागोठणे परिसरातील कुहिरे गावातील अनेक नागरिकांकडून माझ्याकडे येथील दुर्गंधी बाबत तोंडी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. रिलायंस बायोगॅस कंपनी यांच्या या प्रकल्पाचे काम सुरू झाल्यापासून कुहिरे गाव व आजूबाजूच्या परिसरात सातत्याने तीव्र व असह्य दुर्गंधी पसरत आहे. ही दुर्गंधी विशेषतः सकाळी व रात्रीच्या वेळी अधिक प्रमाणात जाणवत असून ग्रामस्थांना दैनंदिन



जीवन जगणे कठीण झाले आहे. या दुर्गंधीमुळे अनेक नागरिकांना घराचे दरवाजे व खिडक्या दिवसभर बंद ठेवावे लागत आहेत. लहान मुले, जेष्ठ नागरिक व महिलांना डोकेदुखी, मळमळ, उलट्या होण्याची भावना, घशात खवखव व श्वसनास त्रास अशा आरोग्यास घातक तक्रारी जाणवत आहेत. काही नागरिकांनी डोळ्यांची जळजळ व अस्वस्थता याबाबतही तक्रारी केल्या आहेत. तसेच, शिहू-नागोठणे मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना देखील या दुर्गंधीचा तीव्र त्रास सहन करावा लागत असून सार्वजनिक रस्त्यावर अशा प्रकारचा वास येणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. भविष्यात यामुळे सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.

परिस्थितीवर त्वरित नियंत्रण न ठेवल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ स्थळ पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी संजय भोईर यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली आहे.

## कचरा जाळल्याने मोठ्या प्रमाणात प्रदुषण | नागरिकांसह गुरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

# पाली डम्पिंग ग्राऊंडची प्रचंड दुरवस्था

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

पाली येथील टेंबी व शिक्षक वसाहती जवळ असलेल्या डम्पिंग ग्राउंड ची प्रचंड दुरावस्था झाली आहे. प्रदूषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय गुरांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे.

संरक्षक भिंत नसल्याने डम्पिंग ग्राउंड मधील कचरा मोठ्या प्रमाणावर अस्ताव्यस्त झाला आहे. रस्त्यावर देखील आला आहे. तसेच, या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी हा कचरा जाळला जातो. परिणामी मोठ्या प्रमाणात वायु प्रदुषण होते. ओला व सुका कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणत्याच शास्त्रीय पद्धतीचा वापर होत नाही किंवा कचऱ्यावर विलगीकरणाची प्रक्रिया देखिल केली जात नाही. परिणामी कचारा गाडीतुन डम्पिग ग्राऊंडमध्ये ओला-सुका कचरा एकत्रितरित्या गोळा करुन टाकला जातो. आणि तेथेच तो जाळला जातो. परिणामी सुका कचरा अनेक दिवस तशाच जळत राहतो त्यामूळे मोठ्या प्रमाणात विषारी धुर निर्माण होऊन वायु प्रदुषण होते. तसेच, ओला कचरा न जळाल्याने तो तेथेच सडत राहतो. त्यामुळे आजुबाजूच्या परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरते. या दुर्गंधी बरोबरच रोगराईचा प्रसार होतो. पावसाळ्यात हे दूषित पाणी मानवी वस्तीत शिरते. या डंपिग ग्राऊंड जवळ शिक्षक वसाहत आणि इतर वसाहती आहेत. शिवाय मढाळी व शिळोशी गावाकडे जाणारा रस्ता आहे. परिणामी येथील रहिवासी, पादचारी व चालकांना याचा त्रास होतो.



#### जनावरांचे आरोग्यही धोक्यात

गाय, बैल, म्हशी, कुत्रे तसेच कावळे हे पशुपक्षी डंपिंग ग्राऊंडमध्ये खाण्याचे काही मिळते का यासाठी फिरत असतात. आणि प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये टाकलेले अन्न पदार्थ तसेच पिशवी सकट ते खातात. त्यामुळे त्यांचेही आरोग्य धोक्यात येत आहे. येथील प्लास्टिक खाऊन कित्येक गुरांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

> डम्पिंग ग्राऊंड आद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. यामध्ये कंपोस्ट पिट्स (खत खड्डे) आणि एम.आर.एफ. शेडचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. कंपोस्ट खत खड्ड्यांचे काम पूर्ण होताच ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मितीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल. एम.आर.एफ. शेडमध्ये सुक्या कचऱ्याचे विलगीकरण केले जाईल. तसेच, प्लास्टिक बेलिंग मशीनचा वापर करून प्लास्टिक कचऱ्याचे कॉम्प्रेस्ड बेल्स (गठ्ठे) तयार केले जातील. सुरक्षा भिंतीच्या बांधकामासाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. – माधुरी मडके, मुख्याधिकारी, नगरपंचायत, पाली

> या डम्पिंग ग्राउंडच्या प्रदूषणाकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळचे दुर्लक्ष आहे. नगरपंचायतने डम्पिंग ग्राउंड बंदिस्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळे गुरांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. एकीकडे क्रीडा मैदानाला कोट्यावधीचा निधी आणि दुसरीकडे नागरिकांच्या व गुरांच्या आरोग्याकडे स्पष्टपणे दुर्लक्ष होत आहे. नगरपंचायत प्रशासन डम्पिंग ग्राउंड मध्ये लाखोंची कचरा विल्हेवाट लावण्याची यंत्रणा धुळखात ठेवून कचरा बेकायदेशीरपणे जाळून प्रदूषण करीत आहेत.
> – कपिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पाली

## शाश्वती नसलेले जग

जगातला व्यापार सुरळीत चालण्यासाठी शाश्वती नावाची गोष्ट फार महत्वाची असते. सरकारी धोरणे, कर हे वारंवार बदलणार नाहीत, दीर्घकाळपर्यंत कायम राहतील व त्यात कोणताही गोंधळ नसेल हे व्यापारासाठी आवश्यक असते. डोनाल्ड ट्रम्प नावाच्या उद्दाम सत्ताधीशाने ही शाश्वतीच खलास करून टाकली आहे. गेले वर्षभर आयातकराबाबत सर्व जगाने त्यांच्या लहरी धोरणाचा फटका सहन केला. आता तेथील सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचे निर्णय बेकायदा ठरवले असले तरी ही शाश्वती लवकर परतण्याची शक्यता नाही. डोनाल्ड ट्रम्प हे स्वतःला अमेरिकेचेच नव्हे तर जगाचे सम्राट समजतात. या उद्दाम सम्राटाला अमेरिकेतल्या न्यायाधीशांनी त्याची जागा दाखवून दिली आहे. अर्थात, त्याची गुर्मी इतकी सहजी उतरणारी नाही. जगातले सगळे देश अमेरिकेचा गैरफायदा घेतात, अमेरिकी बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणात विकतात, मात्र त्या प्रमाणात अमेरिकेकडून खरेदी मात्र करीत नाहीत अशी ट्रम्प यांची तक्रार आहे. या विषम व्यापारामुळे अमेरिकी जनतेचे अतोनात नुकसान होत असून त्यावर अक्सीर इलाज करायलाच मी सत्तेत आलो आहे असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. अमेरिकेला आपल्याला पुन्हा महान करण्यासाठी इतर देशांवर दणादण आयातकर लावणे आवश्यक आहे हे त्यांनी आपल्या समर्थकांच्या गळी उतरवले आहे. त्यामुळेच ट्रम्प यांना आजही अमेरिकेच्या कामगारवर्गात तसेच इतर वंशियांचा द्वेष करणाऱ्या गोऱ्या अमेरिकी लोकांमध्ये चांगला पाठिंबा आहे. त्याच जिवावर ट्रम्प पुढे चालले होते. पण हे करताना, सर्व काही आले ट्रम्प यांच्या मना असा कारभार चालू होता. त्यानुसार ते मनात येईल तेव्हा वाट्टेल ते आदेश काढत होते. याच रीतीने त्यांनी भारतीय मालावर सर्व जगात सर्वाधिक असे ५० टक्के आयातशुल्क लागू केले होते. भारत रशियाकडून तेल आयात करतो याची शिक्षा म्हणून जास्तीचा २५ टक्के कर होता आणि तो ५०० टक्क्यांपर्यंत नेण्याची धमकीही ते देत होते. हे करताना ते अमेरिकेतील संसदेची संमती वगैरे काहीही घेत नव्हते. शुक्रवारी तेथील सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांच्या याच मनमानीला फटका दिला.

### कर परत करणार?

अमेरिकेचा अध्यक्ष युध्द किंवा अत्यंत तातडीच्या काही प्रसंगांनुरुप देशहिताचे निर्णय घेऊ शकतो. त्याच अधिकारांचा बेगुमान वापर ट्रम्प करीत होते. वास्तविक सध्या अमेरिकेवर कोणतेही संकट नाही किंवा युध्दही सुरू नाही. तरीही यांचे दर दिवशी कर लावणे चालू होते. हाच प्रकार न्यायालयाने बेकायदा ठरवून तूर्त तरी बंद पाडला आहे. यामुळे ट्रम्प यांना अटकाव करणारी निदान एक तरी यंत्रणा अमेरिकेत शिल्लक आहे हे दिसले आहे. अर्थात, ट्रम्प यांचा सत्तेचा माज सहजासहजी उतरणारा नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यांनी आपल्याला न्यायाधीशांची लाज वाटते अशा शब्दात त्यांचा उध्दार केला आहे. खुद्द न्यायाधीशांनाच त्यांनी देशद्रोही ठरवले असून अमेरिकेच्या हिताचे त्यांना काही बघवत नाही अशी टीका केली आहे. अध्यक्ष म्हणून आपण काय वाट्टेल ते करू शकतो, पण न्यायालयांचा आदर राखण्यासाठी आपण इतके दिवस गप्प राहिलो असेही ते म्हणत आहेत. आता आपले दुसरे अधिकार वापरून हे आयातकर परत लागू करू असा इशाराही त्यांनी दिला असून त्यानुसार सर्व देशांवर १५ टक्के सरसकट आयातकर लावण्याची घोषणा त्यांनी करून टाकली आहे. आता त्यांनाही आव्हान दिले जाणार हे नक्की आहे. शिवाय ट्रम्प यांनी गेल्या वर्षभरात अनेक देशांशी आयातकरांच्या नव्या दरांच्या आधारे व्यापार करार केले आहेत. भारताशीही असाच करार करण्याचा घाट घातलेला आहे. या करारांचे भवितव्य काय राहणार, त्यांच्यातही बदल होणार का याबाबत सध्या गोंधळ आहे. ट्रम्प यांच्या फतव्यांनंतर अमेरिकी सरकारने गेल्या वर्षभरात सुमारे १४००० कोटी डॉलर्स इतके प्रचंड कर गोळा केले आहेत. हा आकडा वेगवेगळे लोक वेगवेगळा देत आहेत. मात्र न्यायालयाच्या निर्णयानंतर हा कर बेकायदा ठरवल्यामुळे त्या त्या देशांना परत करावा लागणार का अशा चिंतेने अमेरिकी प्रशासनाला ग्रासले आहे. तसे झाले तर अमेरिकी अर्थव्यवस्थेला तो मोठा फटका असेल.

### भारताचे झुकणे थांबायला हवे

ट्रम्प यांनी भारताशी करार होत असल्याची घोषणा २ फेब्रुवारीला एकतर्फी केली होती. भारतावर आधी लागू केलेला ५० टक्के कर कमी करून आता तो १८ टक्क्यांवर आणला जाईल असे ट्रम्प म्हणाले होते. या प्रस्तावित कराराचा आराखडा म्हणून दोन्ही देशांनी एक संयुक्त निवेदन जारी केले होते. याबाबतही अर्थातच अमेरिकी काँग्रेस किंवा संसदेत कसलीही चर्चा झालेली नव्हती. त्यामुळे या आराखड्याचे किंवा कराराचे नेमके भवितव्य काय हा प्रश्नच आहे. मात्र ट्रम्प यांच्या सततच्या फतव्यांमुळे नरेंद्र मोदी सरकारची जी पंचाईत चालू होती ती आता काही काळ थांबेल हा त्यातल्या त्यात दिलासा आहे. रशियाकडून तेल आयात करीत असल्याबद्दल ट्रम्प यांनी भारताला विशेष शिक्षा केली होती. पण चीन हा रशियाकडून तेल घेणारा सर्वात मोठा देश आहे. दुसरीकडे फ्रान्स, जर्मनी व इतर युरोपीय देश रशियाकडून होणाऱ्या नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर पूर्णपणे अवलंबून आहेत. एकीकडे युक्रेन युध्द चालू असताना तसेच सर्व युरोपचे सैन्य एकत्र करून रशियाचा मुकाबला करण्याची भाषा केली जात असताना हा नैसर्गिक वायूचा व्यापार थांबलेला नाही. उद्या रशियाने नैसर्गिक वायू देणे थांबवले तर युरोपचे उद्योगधंदेच नव्हे तर रोजचे आयुष्य बंद पडेल. मधल्या काळात रशियाकडून वायू घेणे थांबवून अमेरिका व इतर देशांकडून तो घ्यावा असा प्रयत्न झाला. पण तो यशस्वी झालेला नाही. याचा सारांश इतकाच की तेलाच्या खरेदीमुळे भारताकडून रशियाला पैसे मिळत आहेत तसेच वायूच्या व्यवहारामुळे युरोपीय देशही रशियाला भरपूर पैसे देत आहेत. म्हणजेच ते किंवा चीन हेही युक्रेन युध्दाला मदत करीत आहेत असे म्हणायला हवे. पण ट्रम्प हे या संदर्भात केवळ भारतालाच लक्ष्य करीत आहेत. आश्चर्याची गोष्ट अशी की, एरवी ५६ इंची छातीच्या बाता करणारे आपले पंतप्रधान ट्रम्प यांचे हे सर्व हल्ले गेले वर्षभर निमूटपणे सहन करीत आहेत. पाकिस्तानसोबतचे युध्द थांबवण्यासाठी ट्रम्प यांनी भारताला भाग पाडले का हा प्रश्न यामुळेच अनुत्तरीत आहे. शिवाय, ट्रम्प भारताला इतक्या धमक्या देताहेत त्यामागे एपस्टीन फाइल्स, अदानीची अमेरिकी कोर्टातली केस अशी काही कारणे आहेत का या विरोधकांच्या प्रश्नाचाही स्पष्ट खुलासा आजवर झालेला नाही. त्यातले तथ्य काहीही असो, पण भारत अमेरिकेसमोर झुकत चालला आहे असे वातावरण आहे. आता तेथील न्यायालयाच्या निर्णयानंतर तर ते बदलणार का हे पाहावे लागेल.

**विचार**

# सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ हवे

***आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.***



भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९० च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरु नये.


२०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक म हत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये करधोरणाच्या दृष्टीने 'सेफ हार्बर' नियमांमध्ये करण्यात आलेली सुधारणा आयटी क्षेत्रासाठी दिलासादायक आहे. सेफ हार्बरची मर्यादा लक्षणीयरीत्या वाढवण्यात आल्याने मोठ्या उलाढाली असलेल्या कंपन्यांनाही कर निर्धारणात निश्चितता मिळणार आहे. कर वाद, नोटिसा आणि प्रदीर्घ न्यायप्रक्रिया यापासून उद्योगांची सुटका होऊन कंपन्या मुख्य व्यवसायावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतील. याचा थेट परिणाम उत्पादकतेवर आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर होणार आहे. ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील युवकांना आयटी कौशल्ये मिळावीत, महिलांचा तंत्रज्ञान क्षेत्रातील सहभाग वाढावा आणि नवीन पिढी भविष्यातील नोकऱ्यांसाठी सज्ज व्हावी यासाठी विविध योजना आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. यामुळे आयटी क्षेत्राचा सामाजिक प्रभाव अधिक व्यापक होणार आहे. आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादेत न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

deepak@deepakshikarpur.com
**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# गुटखा बंदी फक्त कागदावरच?

वैष्णवी वाडकर



राज्यात २०१२ पासून गुटखाबंदी लागू असली तरी अनेक भागांत आजही त्याची खुलेआम विक्री सुरु असल्याचे चित्र वेळोवेळी समोर येत आहे. बंदी असूनही गावापासून शहरी भागापर्यंत गुटखा सहज उपलब्ध होत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे बंदची अंमलबजावणी फक्त कागदावरच केली जाते का? अशी चर्चा नागरिकांमधून होत आहे.

कायद्याने गुटखा उत्पादन, साठवणूक, विक्री आणि वाहतुकीवर बंदी आहे. तरीही किराणा दुकाने, टपऱ्या, बसस्थानके, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा मिळत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे बंदीमुळे विक्री उघडीपणे न होता लपूनछपून केली जात असल्याची चर्चा आहे. बंद दरवाज्याचा आत गुटखा विकला जात असल्यामुळे गुटखा बाजार भावापेक्षा दुप्पट तिप्पट किमतीने विकला जातो. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होत असून दुसरीकडे बेकायदेशीर व्यापाराला गुप्तपणे चालना मिळत आहे. या बेकायदेशीर गुटखा विक्रीचा परिणाम तरुण पिढीवरही होताना दिसत आहे. शाळा-महाविद्यालयांच्या जवळच बेकायदेशीर रित्या टपऱ्या व किराणामालाच्या दुकानांवर गुटखा उपलब्ध होत असल्याने तरुण पिढी व्यसनाच्या अधीन जाताना दिसत आहे. त्यामुळे बेकायदेशीररित्या होणारी गुटका वाहतूक थांबावी यासाठी शासनाने कडक पाऊले उचलावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

गुटखा विक्रीवर बंदी असतानादेखील गुटखा सहज उपलब्ध कसा होतो? विक्रेत्यांपर्यंत हा गुटखा पोहोचतो कसा? असे प्रश्न अनेकांना पडले आहेत. स्थानिकांच्या मते, हा गुटखा परराज्यातून चोरमार्गाने आणला जातो. त्याची साठवणूक महामार्गालगतच्या गोदामात केली जाते व रात्रीच्या वेळी हा गुटखा विक्रेतात्यांपर्यंत पोहचवला जातो. हा गुटखा शहरी भागापासून ग्रामीण भागापर्यंत सगळीकडे पोहचवला जातो. या बेकायदेशीर गुटखा विक्री, साठवणूक व वाहतुकीवर कारवाई करण्याची जबाबदारी अन्न व औषध विभागाची असल्याचे सांगण्यात येते. वेळोवेळी अन्न व औषध विभागाकडून गुटखा विक्रेत्यांवर कारवाई देखील केली जाते. मात्र, पुन्हा काही दिवसांनंतर परिस्थिती जैसे थेच दिसून येते. त्यातच ही कारवाई फक्त किरकोळ विक्रेत्यांवरच होते, अशी टीका होत आहे. मात्र, या कारवाईपासून सामान्य विक्रेत्यांना गुटखा पुरवणारे मात्र लांबच आहेत. परराज्यातून गुटखा मागवून ते विक्रेत्यांना पुरवणारे कारवाईपासून बचावलेले जातात व कारवाई फक्त सामान्य विक्रेत्यांवर केली जात असल्याने गुटखा वितरीत करणाऱ्यांना पकडण्याचे मोठे आव्हान अन्न व औषध प्रशासनावर आहे.

गुटखा दीर्घकाळ सेवन केल्यास तोंडाचा, घशाचा तसेच अन्ननलिकेचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. दात व हिरड्यांचे आजार, दुर्गंधी, पचनाचे त्रास, तसेच हृदयविकाराचा धोका वाढण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते. देशात तोंडाच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण ही चिंतेची बाब मानली जात असून त्यामागे तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे एक प्रमुख कारण असल्याचे सांगण्यात येते. याबाबत वैद्यकीय तज्ज्ञ सातत्याने इशारा देत आहेत. एवढेच नव्हे तर गुटख्याच्या पॅकेटच्या मागेही ठळक अक्षरात आरोग्याविषयक चेतावणी दिलेली असते. तंबाखू सेवन घातक आहे, तोंडाच्या कर्करोगास कारणीभूत ठरू शकते, असे इशारे आणि भीषण आजारांची चित्रे छापणे कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे. तरीदेखील या चेतावण्यांकडे दुर्लक्ष करून दुप्पट तिप्पट किमतीने गुटखा खरेदी केला जात असल्याचे वास्तव आहे. गुटखा सेवन थांबवण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. राज्यात २०१२ पासून गुटखा उत्पादन, साठवणूक आणि विक्रीवर बंदी लागू करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी, शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखू विक्रीवर निर्बंध आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृती मोहिमा, व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन शिबिरे आणि आरोग्य विभागामार्फत समुपदेशन सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. काही रुग्णालयांमध्ये तंबाखू सोडण्यासाठी विशेष क्लिनिकही सुरू करण्यात आली आहेत. मात्र, या सर्व उपाययोजनांनंतरही प्रत्यक्षात विक्री आणि सेवन पूर्णपणे थांबलेले नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे गुटखा बंदीची प्रभावी अंमलबजावणी, पुरवठादारांवर कठोर कारवाई आणि नियमित जनजागृती करायला हवी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अन्यथा आरोग्यावरील गंभीर परिणामांची जाणीव असूनही गुटखा सेवनापासून नागरिकांना थांबवता येणार नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**लोकसंसद**

## भारतभूमीवर चित्त्यांची संख्या वाढतेय!

साडेतीन वर्षांपूर्वी 'प्रोजेक्ट चित्ता' अंतर्गत १७ सप्टेंबर २०२२ रोजी नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतून आणलेल्या आठ चित्त्यांना मध्य प्रदेशातील श्योपूर जिल्ह्यातील कुनो-पालपूर या वन्यजीव अभयारण्यात सोडण्यात आले. त्यानंतर देशातील चित्त्यांची संख्या सातत्याने वाढत असून अलीकडेच या अभयारण्यात दक्षिण आफ्रिकेतून आणलेल्या 'गामिनी' या मादी चित्त्याने तीन बछड्यांना जन्म दिल्याने भारतातील एकूण चित्त्यांची संख्या ३८ वर पोहोचली आहे. यापैकी भारतात जन्म झालेल्या बछड्यांची संख्या आता २७ इतकी झाली आहे. वास्तविक एकेकाळी आपल्या देशात हजारोंच्या संख्येने चित्ते होते. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळातील राजेशाही काळात आणि नंतर ब्रिटीश काळात चित्त्यांची मोठ्या प्रमाणात शिकार झाली. हे प्रमाण इतके प्रचंड होते की सरकारने १९५२ साली भारतातून चित्ता पूर्णपणे नामशेष झाल्याचे अधिकृतरित्या घोषित केले. सुदैवाची बाब म्हणजे त्यावेळी भारतातून चित्ता लुप्त झाला असला तरी जगाच्या पाठीवर आफ्रिका खंडातील दक्षिण आफ्रिका, नामिबिया, बोट्स्वाना, केनिया, टांझानिया इत्यादी देशात तेव्हा सुमारे ७ हजार चित्त्यांचे अस्तित्व होते. त्यामुळे २०२२ मध्ये तब्बल सत्तर वर्षानंतर पुन्हा एकदा चित्त्याची पावले भारतभूमीवर उमटण्यास त्या देशांची मदत झाली. आता वर्षागणिक देशातील 'चित्त्यांची' पावले वाढत असताना वन्यजीव प्रेमींमध्ये आनंदाची लहर उमटली आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# कर्मयोगी संत गाडगे महाराज

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत.

अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १५० वि जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# मैदानांवर मद्यपींचा विळखा


**|| रात्री वाढला उपद्रव; पोलीस गस्त अपुरी || नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण, कारवाईची मागणी**

**| नविन पनवेल | प्रतिनिधी |**

खारघर परिसरातील विविध सेक्टरमधील खेळाची मैदाने आणि सार्वजनिक उद्याने ही नागरिकांच्या दैनंदिन आरोग्यदायी जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग मानली जातात. सकाळ-सायंकाळ फिरण्यासाठी, व्यायामासाठी तसेच लहान मुलांच्या खेळासाठी ही ठिकाणे गजबजलेली असतात.

मात्र, अलीकडील काही दिवसांत या मैदानांवर आणि उद्यानांमध्ये रात्री उशिरापर्यंत मद्यपींचा सुळसुळाट वाढल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सिडकोने सेक्टरनिहाय विकसित केलेल्या या मैदानांमध्ये दिवसा क्रिकेटचे प्रशिक्षण, क्रीडा उपक्रम आणि ज्येष्ठ नागरिकांची वॉकिंग यामुळे उत्साही वातावरण असते, परंतु रात्री तरुणांचे गट मद्यपान करत बसत असल्याचे चित्र दिसत आहे. मद्यपानानंतर काचांच्या बाटल्या व प्लॅस्टिक कचरा मैदानात टाकून दिला जात असल्याने स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सकाळी फिरायला येणाऱ्या नागरिकांना आणि लहान मुलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. पोलिस गस्तीचे प्रमाण कमी असल्याने महिलांमध्ये आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.



सीसीटीव्ही बसविणे, नियमित गस्त वाढविणे आणि नियमभंग करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

सेक्टर ६ ते सेक्टर १२ दरम्यान नाल्यालगत रात्री १२ ते २ या वेळेत मद्यपींचा उपद्रव सुरू असून, स्थानिकांनी विरोध केल्यास मारहाणीच्या धमक्या दिल्या जातात.

याशिवाय परिसरात उभ्या वाहनांमधून पेट्रोल चोरीचे प्रकारही वाढले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षितता राखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

> **रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त नियमितपणे सुरू असते. तसेच नागरिकांच्या तक्रारी असतील, तर गस्तीचे प्रमाण वाढविले जाईल.**
> **-संजय जोशी, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, खारघर पोलीस ठाणे**

रात्रीच्या वेळेस नियमित पोलीस गस्त नसल्यामुळे मद्यपींचा उपद्रव वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सीसीटीव्ही यंत्रणा, प्रकाशयोजना आणि कडक दंडात्मक कारवाई केल्यास परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ फेब्रुवारी

१) श्री.हनमंत महादेव ममदापूर
वरसोली,अलिबाग
२३-०२-१९५७

२) श्रीम. शालिनी जालिंदर सदाफुले
श्रीबाग-२, अलिबाग
२३-०२-१०४६

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**स्व. सुमती दशरथ शिरधनकर, सातिर्जे, अलिबाग**

## पांडुरंग पिंगळे यांचे निधन

**रसायनी :** वारकरी संप्रदायाचे घोडिवली परिसरातील प्रमुख पांडुरंग गोपाळ पिंगळे यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. पिंगळे हे वारकरी संप्रदाय कार्यात नेहमी सहभागी असायचे,परिसरातील आळंदी पंढरपूर वारीचे प्रमुख आधारस्तंभ, सामाजिक कार्यकर्ते व दानशूर व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. त्यांच्या निधनाने एक समाजाभिमुख कार्यकर्त्यास परिसर मुकल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यांच्या अंत्यविधीसाठी सर्वच स्तरातून नागरिक उपस्थित होते. त्यांच्या मागे चार मुलगे, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य मंगळवारी २४ फेब्रुवारी २०२६ रोजी घोडीवली येथे राहत्या घरी होणार आहेत.



---

# विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण उत्साहात



**| वावोशी | प्रतिनिधी |**

खालापूर येथील स्वामी विवेकानंद विद्यालय येथे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.

शाळेचे मुख्याध्यापक एस. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राजीव मुळेकर, डॉ. रविंद्र विष्णू जाधव, क्षमा आठवले, पुंडलिक पाटील, डॉ. महादेव शिंदे, अशोक जगताप, बबन जगताप तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे यांनी केले तर शाळेचा वार्षिक अहवाल सतीश राणे यांनी सादर केला. कार्यक्रमाची सांगता चला शाळेत मुलांना पाठवू, शिक्षण देऊन मोठे करू या गीताने झाली. यावेळी शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘नारायण सुर्वेंच्या कविता माणसातील माणूस जिवंत करणाऱ्या’

**| नेरळ | प्रतिनिधी |**

अनुभवाच्या मुशीतून तावून सुलाखून निघालेली नारायण सुर्वे यांची कविता माणसातील माणूस जिवंत करणारी असून त्यांच्या कवितेतून अपार संवेदना पाझरत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी नेरळ येथे केले. कवी पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त गिरीश कंटे यांनी संपादित केलेल्या ‘कवी नारायण सुर्वे साहित्य गौरव ग्रंथ’ या पुस्तकाचे प्रकाशन नेरळ येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात उत्साहात पार पडले.

स्वातंत्र्यसैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठान आणि पीपल्स पब्लिकेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रकाशन सोहळ्यात रानकवी तुकाराम धांडे म्हणाले की, नारायण सुर्वे यांची कविता डोंगराएवढी भव्य आणि झऱ्यासारखी स्वच्छ



आहे; म्हणूनच तिचा ओघ थेट माणसाच्या काळजाला भिडणारा ठरतो. विद्यासेवक सहकारी पतपेढीचे अध्यक्ष सुधीर घागस यांनी आपल्या भाषणात, नारायण सुर्वे यांच्या कर्मभूमीत हा कार्यक्रम होत आहे, हा एक वेगळा ऐतिहासिक क्षण आहे. साध्या विचारांचा पण तेजस्वी प्रकाश देणारा कवी या मराठी मातीत जन्मला, ही आपली भाग्याची बाब आहे, असे सांगितले.

पीपल्स पब्लिकेशनचे प्रकाशक प्रा. हरेंद्र सोस्टे यांनी ग्रंथपर भाष्य करताना नारायण सुर्वे यांच्या साहित्य व जीवनप्रवासावर आधारित लेखांचे सखोल विवेचन केले. यावेळी व्यासपीठावर ग्रंथाचे संपादक गिरीश कंटे, प्रतिष्ठानच्या संस्थापिका अनुसया जामघरे, सावळाराम जाधव, प्रसाद पाटील, शरद भगत, कल्पेश भोईर, प्राची पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात ग्रंथात लेखन करणाऱ्या लेखकांचा स्मृतिचिन्ह, ग्रंथ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक घिगे यांनी केले, सूत्रसंचालन वसंत घावट यांनी तर आभार प्रदर्शन संघपाल वाठोरे यांनी केले.

---

# श्री राधाकृष्ण मंदिराचा वर्धापन दिन

**| तळा | प्रतिनिधी |**

तळे येथील नामदेव शिंपी समाजाच्या श्री राधाकृष्ण मंदिराचा १२३ वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि. २०) रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आला. श्रीदेव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज ही जवळपास १२५ वर्षाची संस्था असून या संस्थेमार्फत अनेक उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून श्री राधाकृष्ण मंदिराचा १२३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी खालू बाजा, भजन, फटाक्यांची आतषबाजी, महिला वर्गांचे लेझीम यामुळे पालखी मिरवणुकीला शोभा आली. भक्ती भावाने अबाल वृद्ध, तरूण तरुणी, महिला आनंदाने नाचताना विठुरायाचा गजर करीत होते.

पालखी मिरवणूक प्रसंगी आदिनाथ सांप्रदायिक भजन मंडळ पिटसई कोंड यांची उत्तम साथ लाभली. भजनासाठी श्रीराम कजबजे, सतीश मुद्राळे, प्रकाश वडके, भाई क्षिरसागर, सूर्यकांत रोडे, सुभाष क्षिरसागर, पुरुषोत्तम मुळे, केशव सुतार, प्रसाद बारटक्के, प्रदीप मेकडे, नंदकुमार बारटक्के, चंद्रकांत खातू, रमेश सकपाळ, खांडके, बिरवाडकर, सुनील पितळे, रश्मीन वेतकर, कमा पटेल, सुरेश वडके आदी भाविकांची सुंदर साथ लाभल्यामुळे हा सोहळा उत्सव आनंदी वातावरणात पार पडला.

उत्सव सोहळा संस्थेचे अध्यक्ष श्रीराम कजबजे यांचे मार्गदर्शनाखाली संस्थेचे उपाध्यक्ष प्रसाद बारटक्के, मितेश मुळे, सुयोग बारटक्के, निशांत मुद्राळे, श्रेयस रोडे, राजश्री पाडळकर, अश्विनी मुळे, मधुरा बारटक्के, सतीश मुद्राळे, पुरुषोत्तम मुळे, महेंद्र कजबजे, चंद्रकांत रोडे, नंदकुमार रोडे, कार्यक्रम मंडळाचे सर्व सदस्य, समाज बांधव, भगिनी यांचे सहकार्याने उत्तम प्रकारे पार पडला.

# वरेडीमध्ये शिवशिल्पाचे लोकार्पण

**| नेरळ | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिल्प माणगावतर्फे वरेडीमध्ये उभारण्यात आले आहे. या शिल्पाचे लोकार्पण शिवजयंतीच्यानिमित्ताने करण्यात आले. तालुक्यातील माणगांवतर्फे वरेडी येथे शिवजयंती केवळ उत्सव न ठरता एक ऐतिहासिक उत्सव ठरला. गावातील श्री शिवराज प्रतिष्ठान आणि स्थानिक ग्रामस्थ यांचा मेहनतीतून गावातील मानाई देवीच्या प्रांगणात महाराजांच्या राज्याभिषेकाची प्रतिकृती असलेले शिल्प उभारण्यात. आली. हे कोणत्याही दगड किंवा सिमेंटचे नसून,



संपूर्णतः लोखंडाच्या कलाकुसरीतून साकारलेले परिसरातील एक दुर्मिळ स्मारक ठरले आहे. गणेश हिलाल, जयेंद्र कांबरी योगेश कराळे यांनी आपल्या वेल्डिंग आणि कोरीव कामातून हे शिल्प साकारले आहे.

---

# विद्यार्थ्यांना मोफत वाहनाची व्यवस्था

**| खोपोली | प्रतिनिधी |**

दहावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा नुकतीच सुरू झाली असून, श्री शिव छत्रपती विद्यालय देवन्हावे या शाळेतील विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेसाठी खोपोली येथे परीक्षेसाठी वेळेवर पोहचता यावे. या उदात्त विचारातून अभि युवा ग्रुप देवन्हावेचे ॲड. जयेश तावडे व सर्व सदस्यांनी परीक्षा सुरू असे पर्यंत करण्यात आली. तसेच परीक्षा केंद्रातून घरी सोडविण्यात येत आहे. हा उपक्रम गेली नऊ वर्ष सुरू असलेले सांगण्यात आले. याबाबत अभी युवा ग्रुप देवन्हावेचे ॲड. जयेश




तावडे यांनी सांगितले की, श्री शिव छत्रपती विद्यालय देवन्हावे या शाळेत ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिकण्यासाठी येत असतात.

प्रत्येकाची परस्थिती घरची उत्तमच असते असे नाही.आम्हाला सुद्धा १० वी ची परीक्षा देण्यासाठी खूप समस्या येत होत्या. त्यांची जाणीव मनामध्ये गेली ८ ते ९ वर्ष हा उपक्रम सुरू आहे. यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर शालेत जाता येते, किंवा घरी येवू शकतो.

यावेळी मुख्याध्यापक कचरू चौधरी, यशवंत पाटील, अभि देवेश तावडे, ॲड. जयेश तावडे, जयेश पालांडे, ओंकार वाणी, विलास दाबके, पुंडलिक पाटील, राजा पाटील तसेच मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे

# ‘दिल, दोस्ती,दुनियादारी’संवाद

**| वावोशी | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, खोपोली शाखेतर्फे (दि.२०) फेब्रुवारी रोजी दिल, दोस्ती, दुनियादारी हा उपक्रम खोपोली येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या आनंद शाळा व जूनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स येथे इयत्ता ११ वी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संवादक म्हणून आरती नाईक या उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात रिलेशनशिप,



ब्रेकअप, लव्ह ॲट फर्स्ट साइट अशा विषयांना स्पर्श करून प्रेम व आकर्षण यांतील फरक स्पष्ट करण्यात आला. या कार्यक्रमात ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आसावरी दंडवते व सीमा त्रिपाठी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमासाठी संदीप गायकवाड, राकेश गायकवाड, महेंद्र ओव्हाळ हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी दयानंद पोळ, प्रतिभा मंडावळे, ज्योती भुजबळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

**जिल्ह्यातून ७५ जादा गाड्यांचे नियोजन** | **प्रमुख मार्गावर धावणार गाड्या**

# ठाणे एसटी विभाग शिमगोत्सवासाठी सज्ज

**| ठाणे | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवानंतर शिमगोत्सवासाठी चाकरमानी हे आपल्या गावी जातात. त्यामुळे नेहमीच या चाकरमान्यांना सुखरूप सोडण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे ठाणे विभाग दरवर्षीप्रमाणे यंदाही सज्ज झाले. या वेळी तब्बल ७५ जादा गाड्या सोडण्याचे नियोजन केले. २८ फेब्रुवारीपासून या गाड्यांचे आरक्षण सुरू होणार असून, कोकणातील विविध प्रमुख मार्गांवर या गाड्या धावणार आहेत. अवघ्या काही दिवसांवर आलेल्या होळीचा पारंपरिक शिमगोत्सव कोकणात मोठ्या उत्साहात साजरा होतो. या



**आगार बस संख्या**

**ठाणे खोपट- २१, विठ्ठलवाडी- २१, बोरिवली- १७, कल्याण - १७, भाईंदर- ३, एकूण ७५**

शिमगोत्सवासाठी मुंबई, ठाणे आणि परिसरात नोकरी-व्यवसायानिमित्त स्थायिक झालेला कोकणी माणूस कोकणात जातो. विशेषतः होळीच्या काळात देवाची पालखी नाचवणे, ग्रामदैवतांची पूजा, पारंपरिक खेळ, फागोत्सव आणि सामाजिक एकोपा अनुभवण्यासाठी कोकणी माणूस आवर्जून गाव गाठतो. अशा चाकरमान्यांना नेण्यासाठी ठाणे एसटी सज्ज झाली आहे.

मार्च महिन्याच्या २ तारखेला होळी, तर ३ ला धुळवड आहे. यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने यंदाही विशेष नियोजन केले आहे. ठाणे एसटी विभागाच्या विविध आगारांतून कोकणातील दापोली, खेड, चिपळूण, गुहागर आणि रायगड जिल्ह्यातील महाड या प्रमुख ठिकाणांसाठी नियमित बससेवेव्यतिरिक्त एकूण ७५ जादा एसटी बस सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, बससेवेच्या आगाऊ तिकीट बुकिंगची सुविधा संगणकीय (ऑनलाइन) आणि ऑफलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली असून, बुकिंगची प्रक्रिया २८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत सुरू राहणार आहे. याशिवाय गटाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ग्रुप बुकिंगची स्वतंत्र सोयही करण्यात आली आहे.

---

# निवडक



## ताज्या मासळीच्या दरात वाढ

**अलिबाग :** समुद्रातील ताज्या मासळीला सध्या प्रचंड मागणी असली तरी बदलत्या हवामानाचा मोठा परिणाम मासेमारी व्यवसायावर होत आहे. पहाटे गारठा आणि दुपारनंतर झपाट्याने वाढणारे तापमान असे विचित्र वातावरण सध्या अनुभवास येत असून, या चढउतारामुळे समुद्रातील मासळीची ठिकाणे शोधणे मच्छीमारांसाठी कठीण झाले आहे. परिणामी अनेक मच्छीमारांना मासळी न मिळाल्याने खाली हात परतावे लागत आहे. मासे शोधण्यासाठी वापरले जाणारे फिश फाइंडर किंवा इको साउंडरसारखी सोनार तंत्रज्ञानावर आधारित उपकरणेही अपेक्षेप्रमाणे काम करत नसल्याचे मच्छीमार सांगतात. तापमानातील अचानक बदलामुळे मासे आपली ठिकाणे बदलत असल्याने रडारवर अचूक नोंद मिळत नाही, याचा परिणाम मासेमारीवर होत आहे. याचा थेट परिणाम बाजारपेठेत दिसून येत आहे. ताज्या मासळीचे दर सध्या तिप्पट वाढले असून सुरमय, पापलेट, कोळंबी यांसारखी लोकप्रिय मासळी सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. काही दिवसांपूर्वी चार पापलेट साधारण ४०० रुपयांना मिळत असत; मात्र त्याच आकाराचे पापलेट सध्या १,२०० रुपयांपर्यंत विकले जात आहेत.



## विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून शुभेच्छा

**म्हसळा :** न्यू इंग्लिश स्कुल म्हसळा यांच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी चेअरमन समीर बनकर, व्यवस्थापन अध्यक्ष महेश पवार, उपाध्यक्ष शशिकांत शिर्के, मुख्याध्यापक डि. आर. पाटील, सल्लागार कमिटी सदस्य सुनिल उमरठकर, केंद्र प्रमुख धामणस्कर गुरुजी, भाई बोरकर, पोलीस कॉ.अक्षय पूरी, करडे, शिर्के, मोरे, मांजरेकर, एकनाथ पाटील, तसेच सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते. यावेळी मार्गदर्शन करताना बनकर म्हणाले, आयुष्यात नुसते जगायचे नसते तर प्रत्येक कृतीतून शिकत रहायचे असते. ज्ञानाची भूक ज्याला असेल आणि कुठलीही गोष्ट अर्ध्यातून जो सोडत नसेल, त्याला यश मिळाल्याशिवाय राहात नाही. परिक्षेचा बाऊ न करता आत्मविश्वासाने सामोरे जावे असे त्यांनी सांगितले. यावेळी विविध स्पर्धेत भाग घेऊन बक्षीस मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

## महावितरण कर्मचाऱ्यांचे रक्तदान

**कल्याण :** शिव जयंतीचे औचित्य साधून महावितरण, कल्याण (पूर्व) विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. कल्याण पूर्व विभागीय कार्यालय येथे शिवजयंती निमित्त महावितरणमधील सर्व कर्मचाऱ्यांसाठी चिदानंद चॅरिटेबल ट्रस्ट, ब्लड सेंटर, शास्त्री मार्ग, महानगरपालिका रुग्णालय, डोंबिवली पश्चिम तसेच रोटरी क्लब, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमानाने कल्याण पूर्व विभागात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हे श्रेष्ठदान असून सर्व तांत्रिक व अतांत्रीक कर्मचारी अधिकारी, महिला कर्मचारी यांना आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद देण्यात आला. याप्रसंगी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री जगदीश बोडके, कार्यकारी अभियंता, अमोल चौधरी, शिवाजी काळे, राधिका पवार, राकेश मेहता, मिथुन पाटील तसेच डॉ. डुंबरे, डॉ. घरात, रोटरी क्लब डोंबिवली, डॉ. बिजू चिदानंद चॅरिटेबल ट्रस्ट व सर्व अभियंते कर्मचारी व बाह्यस्त्रोत कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची तळोशी गावाला भेट

**महाड :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानअंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी महाड तालुक्यातील तळोशी गावाला नुकतीच भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. त्यामध्ये सुधारणा करण्याचे आदेश दिले. यामुळे तळोशी गावच्या विकासाला चालना मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी त्यांच्यासोबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तानपुरे, गटविकास अधिकारी उदयसन साळुंखे, सहाय्यक गटविकास अधिकारी रवींद्र जाधव, विस्तार अधिकारी नंदकुमार भगत, दशरथ वाघमोडे, साक्षी पार्टे, संदीप बागडे, सचिन पार्टे, दिलीप पार्टे व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामविकास, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, अंगणवाडी सुविधा आणि शाळांच्या भौतिक सुविधांचा आढावा घेतला. या अभियानाचा उद्देश ग्रामपंचायतींना सक्षम व स्वयंपूर्ण बनवणे हा असून, गाव पातळीवर प्रशासन अधिक परिणामकारक करण्यावर भर दिला जात आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी व ग्रामस्थांशी संवाद साधत प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असे निर्देश दिले. तळोशी ग्रामपंचायतीने केलेल्या स्वच्छता उपक्रमांचे कौतुक करताना पाणी व्यवस्थापन व हरित उपक्रम वाढवण्यावर भर देण्यात आला. गावातील रस्ते व गटारींची स्थिती सुधारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका दर्शविण्यात आली.

## कोंढेतर्फे श्रीवर्धन येथे शिवस्मारकाचे उद्घाटन

**श्रीवर्धन :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कोंढे तर्फे श्रीवर्धन येथे भव्य शिवस्मारकाचे उद्घाटन गुरुवारी (दि.१९) रोजी करण्यात आले. ग्रामस्थ मंडळ कोंढे व श्री काळभैरवनाथ क्रिकेट मंडळ कोंढे, श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गावातील युवक व ग्रामस्थांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेले हे शिवस्मारक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची व स्वराज्याच्या प्रेरणेची आठवण करून देणारे ठरणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात पालखी मिरवणुकीने करण्यात आली. तसेच ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर शिवस्मारकाचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी शिवव्याख्याते संदीप पाटील यांनी शिवचरित्रावर मार्गदर्शन केले. ग्रामस्थ मंडळ कोंढे, प्रमुख मार्गदर्शक, महालक्ष्मी महिला मंडळ कोंढे व श्री काळभैरवनाथ क्रिकेट मंडळ कोंढे यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# नगरपरिषदचे नूतनीकरण संशयाच्या भोवऱ्यात

## •विरोधी पक्ष नेत्याची कारवाईची मागणी



। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरातील १०० वर्षे जुन्या गिरीस्थान नगरपरिषदचे प्रशासकीय कार्यालय असलेली इमारत आपत्कालीन व्यवस्थापन या नियमाचा आधार घेऊन दुरुस्त आणि नूतनीकरण केले जात आहे. मात्र, आपत्कालीन व्यवस्थापन अंतर्गत मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांच्या अधिकारात कामे केली जाऊ शकतात. परंतु, त्यासाठी कमाल दोन लाखाची तरतूद असू शकते; मात्र, २४ लाखाचे काम कोणत्या अधिकारात मंजूर करण्यात आले, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दुसरीकडे रायगड जिल्हाधिकारी यांची परवानगी घेऊनच आपत्कालीन व्यवस्थापन मधील कामे करावी लागतात. मात्र, जिल्हाधिकारी यांच्याकडून सध्याची आपत्कालीन परिस्थिती नसताना हेरिटेज कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात येत असल्याने सरकार या प्रकरणाची चौकशी करणार का? असा प्रश्न माथेरान नगरपरिषदमधील विरोधी पक्षाचे नेते सीताराम कुंभार यांनी केला आहे.

हेरिटेज वास्तू म्हणून नोंद असलेल्या गिरीस्थान नगरपरिषद इमारतीच्या दुरुस्तीचे आणि नूतनीकरणाचे काम सुरू आहे. माथेरान पालिकेत लोकनियुक्त सदस्य मंडळ अस्तित्वात आले; परंतु, पालिकेच्या सदस्य मंडळाची सर्वसाधारण सभा झालेली नसताना नगरपरिषद कार्यालयाचे दुरुस्ती आणि नूतनीकरण केले जात आहे. हे काम करण्यासाठी ५८/२ या कायद्याचा आधार घेण्यात आला असून त्या कायद्याच्या आधारे आपत्कालीन परिस्थितीत त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थामधील मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांना कामे करण्याचा अधिकार आहे. मात्र, सध्या पावसाळा नाही आणि माथेरानमध्ये कोणतेही आपत्कालीन परिस्थिती नाही. माथेरान पालिकेचे कार्यालय हे देखील सुस्थितीत असताना सुशिभिकरणाच्या नावाखाली तेथे आपत्कालीन व्यवस्थापन हा निकष लावून कार्यालयाची दुरुस्ती करण्यास सुरुवात झाली. त्यावेळी देखील तेथे सुरू करण्यात आलेली दुरुस्तीची कामे ही जेमतेम दोन लाख निधीपर्यंत मर्यादा असते; मात्र, माथेरान नगरपरिषद कार्यालयाची इमारत दुरुस्ती आणि नूतनीकरण ही कामे करण्यासाठी २४ लाखाचे अंदाजपत्रक तयार केले असल्याचे सांगण्यात आले आहे. असे असताना त्या कामाला नगरविकास सह सचिव दर्जाचे अधिकारी असलेले जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक असते. सध्या पावसाळा किंवा आपत्कालीन स्थिती नसल्याने रायगड जिल्हाधिकारी अशा चुकीच्या पद्धतीने समोर आलेल्या कामाला मंजूरी देण्याची शक्यता कमीच आहे. मात्र, रायगड जिल्हाधिकारी यांनी माथेरान पालिकेच्या इमारतीचे दुरुस्तीच्या कामाला परवानगी आहे किंवा नाही हे देखील अद्याप समोर आलेले नाही.

इमारतीचे नूतनीकरण काम सुरू असल्याने माथेरान पालिकेचे विरोधी पक्षाचे नेते सीताराम कुंभार यांनी आक्षेप घेतला होता. माथेरान हे हेरिटेज शहर म्हणून ओळखले जात असून या इमारतीच्या जागेवर पालिकेने शासनाची परवानगी घेऊन ऐतिहासिक ठरेल अशी इमारत उभारावी. तात्पुरती मलमपट्टी करण्यापेक्षा भव्य वास्तू उभी करावी, जेणेकरून अशी वास्तू पाहण्यासाठी पर्यटक, अभ्यासक येऊ शकतात अशी सर्वसामान्य भावना सीताराम कुंभार यांनी व्यक्त केली आहे. या स्थितीत सुरू असलेले काम थांबवून रायगड जिल्हाधिकारी यांनी संबंधित कामाची चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी माथेरान पालिकेचे विरोधी पक्षाचे नेते सीताराम कुंभार यांनी केली आहे.

## निवडक

### संजय वाजंतरी यांची महत्त्वपूर्ण नियुक्ती



**पनवेल :** सामाजिक व ग्राहक चळवळीच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेले उद्योजक संजय वाजंतरी यांच्या कार्याची दखल घेत त्यांची लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्था या संस्थेमध्ये महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दत्ता पांचाळ, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता माने, ठाणे जिल्हा संघटन सचिव गौरव राजपूत तसेच मुंबई-ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख सरला झालटे यांनी शिफारस करून नियुक्ती निश्चित केली. संजय वाजंतरी यांनी सामाजिक बांधिलकी जपत ग्राहक हक्क संरक्षण, जनजागृती आणि विविध लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजातील अनेकांना न्याय मिळवून देण्यासाठी मदत झाली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे संस्थेच्या कामकाजाला अधिक बळ मिळणार असून ग्राहक संरक्षण चळवळीला नवे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



### नेव्हल आऊटरीच कार्यक्रमाचे आयोजन

**नागोठणे :** शेठ श्री ओटरमल शेषमल परमार कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये नेव्हल आऊटरीच या मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि.२१)करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना इंडियन नेव्ही मधील विविध करिअर संधी, भरती प्रक्रिया, पात्रता निकष व प्रशिक्षण पद्धती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डीआरडीओ) येथील शास्त्रज्ञ डी. रणदीर, वरिष्ठ अधिकारी व्ही.के. चव्हाण, प्रशासन कार्यालयातील परमोध कुमार, वरिष्ठ प्रशासन अधिकारी रामचंद्र नाईक, एडवेंचर क्लब सेक्रेटरी व्ही.एस. गोपाकुमार यांच्यासह रजिस्ट्रार वैभव नांदगावकर, प्राचार्य विशाल पाटील, प्रा. नीलम पाटील, प्रा. ज्योती पालवे व प्रा. श्वेता गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संरक्षण क्षेत्रातील करिअर संधी, संशोधन क्षेत्रातील कार्यपद्धती तसेच साहसी उपक्रमांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम संस्थेचे चेअरमन किशोरशेठ जैन व मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिक जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अन्वी सकपाळ व श्रावणी जाधव यांनी उत्कृष्टरीत्या केले.

### साईबाबा मंदिराचा अनावरण सोहळा



**श्रीवर्धन :** तालुक्यातील भट्टीचा माळ येथे रविवारी (दि.२२) श्री साईबाबा मंदिराचे अनावरण मोठ्या भक्तीमय वातावरणात व मंत्रघोषांत पार पडले. कॅनरा बँकेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी रत्नकांत मोरे यांनी स्वखर्चाने स्वतःच्या जागेत या मंदिराची उभारण केली आहे. त्यानिमित्ताने अतिशय भक्तीमय व पवित्र वातावरणात दि.२१ व २२ फेब्रुवारी रोजी या मंदिरामध्ये पुण्याहवाचन, मातृकापूजन नांदिश्राद्ध, आचार्यवर्ण, अग्निस्थापना, नवग्रह देवता, प्रासादवास्तु, ब्रह्मादिमंडल देवता, मुख्य देवता आवाहन पूजन, मूर्ती प्रतिष्ठापना विधी, मूर्ती, कळस प्रतिष्ठापना, प्राणप्रतिष्ठापना, पूजा, आरती, नैवेद्य इत्यादी कार्यक्रम संपन्न झाले. या कार्यक्रमाचा लाभ श्रीवर्धन तालुक्यासह मुंबईतील अनेक नागरिकांनी घेतला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४) X-Ray साठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८

• शर्वरी एंटरप्रायजेस चेंढरे-अलिबाग येथे सोलर/इलेक्ट्रिकल दुकानात काम करण्यासाठी बारावी पास मुलगा पाहिजे. BA/BCom शिक्षण घेत असलेला सुद्धा चालेल. संपर्क : ७७५५९३२२२९

• शिवाजी पेटशॉप अलिबाग /चोंढी/ पेण येथे कामासाठी कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## लहान मुले उन्हाळी आजारांनी त्रस्त



। उरण । प्रतिनिधी ।

वातावरणातील बदल त्यात वाढत्या उष्णतेमुळे सध्या लहान मुलांना ताप, सर्दी-खोकला, घसादुखी, पोटदुखी, जुलाब-उलट्या यासारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. उष्णते बरोबरच बर्फ घातलेली पेये प्यायल्यामुळे आणि उघड्यावरचे पदार्थ खाल्ल्याने या प्रकारच्या समस्या वाढल्याचे निरीक्षण बालरोग तज्ज्ञांनी नोंदविले आहे. बर्फ आणि अस्वच्छ पाण्यामुळे मुलांमध्ये आरोग्याच्या समस्या वाढू शकतात, त्यामुळे काळजी घेण्याचा सल्ला सध्या रुग्णालयातील डॉक्टरांकडून दिला जात आहे.

उरण व पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण आणि शहरीकरण वाढत आहे. त्यामुळे प्रदुषणात झपाट्याने वाढ होत असून वातावरणातील बदलामुळे दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढले जात आहे. त्यामुळे श्वसनविकार, ॲलर्जी आणि तापाच्या रुग्णांध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यात उघड्यावरचे पदार्थ, अस्वच्छता, अशुद्ध पाणी, बर्फाचे पदार्थ अशा एक ना इतर कारणांमुळे सध्या लहान मुलांना ताप, सर्दी-खोकला, घसादुखी, पोटदुखी, जुलाब-उलट्या यासारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे.अशा आजाराने त्रस्त झाली लहान मुले सध्या उरण, पनवेल तालुक्यातील अनेक रुग्णालयात उपचारासाठी दाखल होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यात तालुक्यातील काही गावांमध्ये वाढत्या घाणीच्या साम्राज्यामुळे व वाढत्या डासांच्या प्रादुर्भावामुळे मलेरिया आणि डेंग्यूचे रुग्ण ही खाजगी रुग्णालयात उपचार करुन घेत असल्याचे दिसून येत आहे.

## मेगा ब्लॉकमुळे प्रवाशांची गैरसोय

। पनवेल । प्रतिनिधी ।

मुंबई उपनगरी रेल्वेच्या हार्बर मार्गावर रविवारी (दि.२२) घेण्यात आलेल्या मेगा ब्लॉकमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. अनेक गाड्या रद्द व उशिराने धावत असल्याने प्रवाशांची गैरसोय झाली. पनवेल स्थानकात प्लॅटफॉर्म वाढविण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून त्यामुळे काही प्रवाशांनी भर उन्हात रूळ ओलांडत पर्यायी मार्ग निवडल्याचे चित्र पाहायला मिळाले. दरम्यान, मध्य रेल्वे प्रशासनाकडून स्थानकात मोठा पादचारी पूल (ब्रिज) उभारण्याचे कामही वेगाने सुरू आहे. भविष्यात वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून सुविधा उभारल्या जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.




● रांगोळीकार नवीन मोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन केले. चारणे नाण्याच्या माध्यमातून साकारलेले महाराजांचे भव्य चित्राने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कलात्मक सादरीकरणातून शिवरायांप्रती असलेला आदर आणि अभिमान व्यक्त झाला. (छायाचित्र: राजेश डांगळे)

## होळीपूर्वीच श्रीवर्धन तापले

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

यंदा होळी सणाच्या आधीच श्रीवर्धनमध्ये तापमानात लक्षणीय वाढ नोंदवली जात आहे. तज्ज्ञांच्या मते साधारणपणे होळीनंतरच उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागते; मात्र, यंदा चित्र वेगळे असून होळीपूर्वीच उकाड्याने जोर धरला आहे.

गेल्या काही दिवसांत दुपारच्या वेळेत कडक उन्हाचा चटका जाणवत असून बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणी वर्दळ कमी झाल्याचे दिसत आहे. समुद्रकिनारी असलेल्या शहरात दमट हवामानामुळे उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे. नागरिकांमध्ये अंगदुखी, थकवा, डोकेदुखी आणि उष्माघाताच्या सौम्य तक्रारी वाढल्याची माहिती स्थानिक वैद्यकीय व्यावसायिकांनी दिली. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, वातावरणातील बदलत्या हवामान पद्धतींमुळे यंदा तापमानाची वाढ लवकर सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, होळीनंतर तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात उष्णतेची लाट अधिक तीव्र होऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## विरेंद्र भगत यांच्याकडून गटारे, नाल्यांची पाहणी



। आगरदांडा । प्रतिनिधी ।

यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टीत कुठलीही दुर्घटना घडू नये यासाठी उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी नुकतीच गोल बंगला, बाजारपेठ, तवसाळकर लॉज इत्यादी ठिकाणी जाऊन नालेसफाईच्या कामाचा आढावा घेतला. त्यांनी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व उपाययोजना सुरु करा. पावसाळ्यात पाणी तुंबता कामा नये. तरी गटारे व नाल्याची सफाईला लवकरात लवकर सुरू करा. ही कामे मे महिन्याच्या आत झाली पाहिजे. असे संबंधित अधिकाऱ्यांना सांगत शहरातील मुख्य बाजारपेठ येथील शौचालयाची देखील पाहणी केली. अधिकाऱ्यांनी यावर लवकरात लवकर उपाययोजना करुन सुंदर व स्वच्छ शौचालय बनवुन नागरिकांना चांगली सुविधा द्या, असेही त्यांच्याकडून सांगण्यात आले. यावेळी मुरुड जंजिरा नगरपरिषद बांधकाम सभापती यास्मिन कादिरी, नगरसेवक ॲड. रुपेश पाटील, नगरसेवक आदेश दांडेकर, नगरसेवक तमीम ढाकम, नगरसेवक श्रीकांत खोत, ओम पाटील, बांधकाम अभियंता अनिकेत वाजे, अनिकेत जगदाळे, अमोल रणदिवे आदिंसह अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## रमजाननिमित्त फळांना मागणी वाढली



। तळा । प्रतिनिधी ।

सद्या सुरू असलेल्या रमजाननिमित्त तळा बाजारपेठेत फळांना मागणी वाढली आहे. रमजान महिन्यात मुस्लिम धर्मीय (रोजा) उपवास पकडतात आणि सायंकाळी फळांचे सेवन करून इफ्तारी करतात. त्यामुळे या दिवसात फळांची मागणी वाढत असते. यंदा गुरुवारपासून रमजान मासाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे तळा शहरातील बाजारपेठेत फळांची मागणी वाढल्याने आवक देखील वाढली आहे.

रमजान महिन्यात उपवास करताना मुस्लिम धर्मिय दिवसभर पाण्याचा एकही थेंब न पिता उपवास करतात आणि सायंकाळी इफ्तार करुन उपवास सोडला जातो. उपवास सोडताना यात रसाळ फळे अधिक असतात. त्यामुळे या दिवसात कलिंगड, आंबा, पपई, खरबूज, अननस, चिकू, द्राक्षे, संत्र अशा रसाळ फळांना अधिक मागणी असते. त्यामुळे रमजान सणानिमित्त तळा बाजारपेठेत उलाढालही वाढते. तळा बाजारपेठेतील सध्या रसाळ फळांचे दर कलिंगड ४० रु. प्रतिकिलो, चिकू १२० रु. किलो, द्राक्षे १२० रु. किलो, अननस १४० रु. किलो, पपई ७० रु. किलो, खरबूज ५० रु. किलो, संत्र १४० रु. किलो, आंबा ३०० रु. किलो याप्रमाणे असून रमजाननिमित्त या फळांना नागरिकांकडून मोठी मागणी आहे.

## नेरे येथे मोफत आरोग्य शिबीर

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. अदानी फाऊंडेशनच्यावतीने आणि नेरे ग्रामपंचायत सदस्य प्रगती फडके व सविता चोरघे यांच्या सहकार्याने तसेच सामाजिक कायकर्त्या हर्षदा मांडवकर व विशाखा कांबळे यांच्या मदतीने हे मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिराचा ८२ नागरिकांनी लाभ घेतला. यात ६९ महिला, ७ पुरुष व ६ मुलांचा समावेश होता. यावेळी ४४ व्यक्तींची मधुमेह चाचणी करण्यात आली. या शिबिराला नेरे ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश घाडगे यांनी भेट दिली.



## पनवेल बाजारात कलिंगडाची विक्री तेजीत

। पनवेल । प्रतिनिधी ।

वातावरणातील बदल आणि वाढत्या उन्हाच्या तडाख्यामुळे थंडगार फळांना मोठी मागणी निर्माण झाली असून बाजारात कलिंगडाची विक्री तेजीत आहे. उन्हापासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिक कलिंगड खरेदीकडे मोठ्या प्रमाणात वळत आहेत. बीड जिल्ह्यातून येणारे 'सिंबा' जातीचे गोड व रसाळ कलिंगड पनवेलच्या घाऊक बाजारात दाखल झाले आहे. व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार या कलिंगडाला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्या घाऊक बाजारात कलिंगडाचा दर सुमारे ४० रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचला असून मागणी वाढत असल्याने दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वालाच्या शेंगांना मोठी मागणी | शेतात निसर्गाच्या सानिध्यात मेजवानी

## उरणमध्ये पोपटीचा हंगाम सुरू



। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण परिसरात मागील आठवड्यापासून शेतात तसेच फार्म हाऊसमध्ये पोपट्या पार्ट्या रंगण्यास सुरुवात झाली आहे. चिरनेर परिसरात आता गावठी वाल व चवळीच्या शेंगा तयार होण्याची सुरुवात झाल्यामुळे पोपटीची लज्जत वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर चिरनेरच्या बाजारात वाल-चवळीच्या शेंगा खरेदी करण्यासाठी ग्राहकांची प्रचंड गर्दीतून येते. ग्राहक आनंदाने या शेंगांची खरेदी करून, पोपटी पार्टीतून गावठी वालाच्या शेंगाची विशिष्ट प्रकारची चव चाखत आहेत.

वालाच्या शेंगा तयार झाल्या की, खवय्यांना चाहूल लागते ती पोपटी पार्टीची. त्यामुळे सवंगड्यांशिवाय कौटुंबिक नात्यांसह मित्र-मैत्रिणींबरोबर पोपटी पार्टीचे बेत आखले जाऊ लागले आहेत. उरण तालुक्यात सध्या वाल-चवळीच्या शेंगाचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे काही दिवसांपासून गावठी वालाच्या व चवळीच्या शेंगा बाजारात येऊ लागल्याने ग्राहक वाल व चवळीच्या शेंगा घेण्यास आतुर झाले आहेत. वाल व चवळीच्या पिकासाठी थंडीचा हंगाम खूप उपयुक्त आहे. हे पीक दवावर तयार होते. जेवढी जास्त थंडी तेवढे पीक मोठ्या प्रमाणावर भरघोस येते. हे पिके तयार होण्यासाठी चार महिन्याचा कालावधी लागतो. या पिकासाठी जास्त मेहनत घ्यावी लागत नाही. सध्या चिरनेरच्या बाजारात चवळी व वालाच्या शेंगांचा एक किलोचा दर १५० रुपये आहे. तरीही वाल-चवळीच्या शेंगांना प्रचंड मागणी असल्याचे रवींद्र भगत यांनी सांगितले.

पोपटी तयार करण्यासाठी येथील मोकळ्या जागी पोपटीचे मडके किंवा पत्र्याचा डबा बसविण्यासाठी थोडासा खड्डा खणला जातो. त्या खड्ड्यात मडके उलटे ठेवले जाते. त्यानंतर मडक्याभोवती पाला, पेंढा, सुक्या काटक्या टाकून, त्याला आग लावली जाते. साधारण अर्धा ते पाऊण तास हे मिश्रण शिजवले जाते. अर्धा ते पाऊण तासाने पोपटी करणारे जाणकार मडक्यावर थोडे पाणी शिंपडतात. चर्र असा आवाज आला की पोपटी शिजल्याचे समजते. पोपटीचा गरमागरम वाफाळता आस्वाद घेण्यासाठी सारे बैठक मारून सभोवार बसतात. मधोमध एका पेपरवर हे मडके ठेवून त्यातील वरचा भांबुर्डीचा पाला काढला जातो. मडक्यातील खमंग भाज्या, मुळ्या तर मांसाहारी असल्यास मटन, चिकन, अंडी बाहेर काढण्यासाठी सगळेजण तुटून पडतात. निसर्गाच्या सानिध्यात शेतावर ही पोपटी पार्टी केली जाते.

# नगरपंचायतींची वाढीव घरपट्टी अधिवेशनात

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

गेल्या दोन वर्षांपासून पोलादपूर नगरपंचायतीच्या प्रशासनाने वाढीव घरपट्टीच्या नोटीसा पाठवून नागरिकांना सळो की पळो करून सोडले आहे. ग्रामपंचायत असताना ज्यांची घरपट्टी ५०० रूपये होती. त्यांना आता ४५००पेक्षा अधिक रकमेची वाढीव घरपट्टी आकारणी करण्याची बिले दिली जात आहेत. यासंदर्भात पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाने २३ फेब्रुवारी पासून आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला होता.

नेत्यांनी विधीमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये हा प्रश्न मांडून पोलादपूरसह १३८ नगरपंचायतींच्या वाढीव घरपट्टीचा विषय मांडण्याची ग्वाही दिल्याने मंचाचे आमरण उपोषण आंदोलन मागे घेण्यात आले आहे.

राज्यात नव्या १३८ नगरपंचायतींची घोषणा होण्यापूर्वी केवळ ७ नगरपंचायती अस्तित्वात होत्या. महानगरपालिका २६, अ वर्गातील नगरपरिषदा १२, ब वर्गातील नगरपरिषदा ६१, क वर्गातील नगरपालिका १४५ अशा एकूण २५१ स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. या १३६ नगरपंचायतींची घोषणा झाली. रायगड जिल्हयातील पोलादपूरसह ६ या तालुक्यांच्या ग्रामपंचायतींना नगरपंचायतींचा दर्जा मिळाला. तेव्हापासून आजतागायत घरपट्टीवाढीची पुनर्रचना करण्याचे राहून गेल्याचे कारण सांगून घरपट्टीवाढीचा आदेश बजावला.

पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे जनआक्रोश मोर्चा काढला. यावेळी पुनर्मोजणी करूनच मालमत्ता करवसुली करण्याची ग्वाही देण्यात आली आणि कलम १०७ प्रमाणे नगरपंचायतीचा ठराव करण्याचे लेखी पत्र मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी स्वाक्षरीसह दिले.

मात्र, कलम १०७ प्रमाणे नगरपंचायतीचा ठराव करताना त्यामध्ये १०० टक्के घरपट्टी माफीचा उल्लेख करण्यात आला जो प्रशासकीय पातळीवर फेटाळला जाईल, अशी भूमिका होती. यानंतर पुन्हा नगरपंचायत पोलादपूरकडून नागरिकांना जानेवारी २०२६ मध्ये नमूना क्रमांक ५२ नियम क्रमांक ६८,९३ नुसार २०२५-२६ कालावधीचे कराचे बिल देण्यात येऊन त्यामध्ये मालमत्ता कर, वृक्ष कर, महा.शिक्षण कर, उपयोगकर्ता शुल्क अशा करांची आकारणी करण्यात आली आहे.

या बिलामध्ये सहामाही कराच्या मागणीचा उल्लेख असून करयोग्य मूल्यदेखील चटईक्षेत्र व निवासीवापरासाठी आतापर्यंतच्या घरपट्टीच्या रक्कमेच्या ५ पटीने अधिक असल्याचे तसेच घरपट्टी भरण्यास विलंब केल्यास दरमहा २ टक्के व्याज आकारणी करण्याचे या मागणी बिलांमध्ये नमूद करण्यात आले. यामुळे पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे उपोषणाचा इशारा देण्यात आला. पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाचे सदस्य प्रसन्ना पालांडे, सुनील भिलारे, शैलेश पालकर, नितीन शेठ, समाधान शेठ, गणेश शेठ यांच्यासह संतोष मोरे, नामदेव शिंदे, राजू धुमाळ, एकनाथ कासुर्डे यांनी कॅबिनेट दर्जाचे आ.प्रवीण दरेकर यांची बांद्रा येथील म्हाडा गृहनिर्माण भवनामध्ये भेट घेतली.

राज्यातील नगरपंचायतींच्या वाढीव घरपट्टीबाबत विधीमंडळ अधिवेशनामध्ये निर्णय घेण्यासाठी लक्ष्यवेधी प्रश्न उपस्थित करण्यासह रायगड जिल्ह्यातील पोलादपूर, तळा आणि पालीसुधागड या तीनही नगरपंचायत हद्दीतील जनतेला उत्पन्नाचे साधन नसताना ही घरपट्टीवाढ न परवडणारी असल्याकडे शासनाचे लक्ष वेधून दिलासा देण्याची ग्वाही देत २३ फेब्रुवारीचे आमरण उपोषण स्थगित करण्याचे आवाहन लेखी पत्राने केले. यामुळे पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे पोलादपूरकर नागरिकांना महायुतीच्या नेत्यांच्या सकारात्मक प्रतिसादाबाबत माहिती देण्यासंदर्भात जनसभेचे आयोजन करण्यात आले असल्याचे मंचातर्फे कळविण्यात आले आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे टाकवे, ता- कर्जत, जि - रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक समीर वसंत घरत व सागर वसंत घरत, दोघे रा- वांगणी नेरे, ता.- पनवेल, जि - रायगड याची खालील वर्णन केलेली मौजे टाकवे येथील जमीन मिळकतीचे वर्णन

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २५ | एकुण क्षेत्र ०.१५.४० हे.आर.पॉ. | ०.११ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदर मिळकत कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दिनाक २३/०१/२०२५

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी.कॉम.एल.एल.बी.)
पत्ता - मु.पो. मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक हरीश राजेंद्र भोपतराव यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ५५ | ७ | ०.१५.०० | ०.०९ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो. नं. ७७९८४३३८८८

सही/-
**ॲड. कैलास अनंत बासरे**

# कर्जत येथील छाया वेखंडे यांची शेतीमध्ये भरारी

## आठ एकरांत बहुआयामी शेती आणि कृषी पर्यटन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

वदप येथील शेतीनिष्ठ शेतकरी छाया विनया वेखंडे यांनी शेतीमध्ये भरारी घेतली आहे.पारंपारिक शेतीला फाटा देत आधुनिक तंत्रज्ञान, सरकारी योजना आणि कृषी पर्यटनाची जोड दिली आहे. तेथील आठ एकर क्षेत्रावर त्यांनी उभे केलेले हे नंदनवन उभारले आहे.रब्बी आणि उन्हाळी हंगामामध्ये या काळात त्या शेतात भेंडी, वाल, हरभरा, कलिंगड, कांदा, टोमॅटो आणि विविध वेलवर्गीय भाजीपाला घेत आहेत. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सामूहिक शेततळे उभारली आहेत.



मालाची प्रतवारी आणि साठवणुकीसाठी आधुनिक 'पॅक हाऊस' बांधले आहे तर प्लास्टिक आच्छादनामधून तण नियंत्रण आणि ओलावा टिकवण्यासाठी मल्चिंग पेपरचा वापर केला आणि त्यामुळे भाजीपाल्याचा दर्जा सुधारला आहे. कृषी यांत्रिकीकरण अंतर्गत आधुनिक अवजारांची जोड देत मजुरांची संख्या कमी होण्यास मदत झाली आहे.

शेतीनिष्ठ शेतकरी छाया विनय वेखंडे यांनी आपल्या शेतीत नाविन्यपूर्ण प्रयोग करताना काळी मिरी ची शेती केली आहे. त्याचवेळी काजू फलोत्पादन आणि मत्स्यपालन करण्यावर देखील भर दिला आहे. आंबा फळझाडांच्या सावलीत ८० काळी मिरीची रोपे लावून त्यांनी उपलब्ध जागेचा १००% वापर केला आहे. नवीन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देताना मागेल त्याला काजू कलमे या योजनेतून त्यांनी ५० काजू कलमांची लागवड केली आहे, जे भविष्यात उत्पन्नाचा शाश्वत स्रोतासाठी प्रयत्न केले आहेत.

आंबा विक्री आणि पर्यटकांच्या ओघामुळे त्यांना वर्षभरात सुमारे १८ लाख रुपयांचा मोठा आर्थिक फायदा होत आहे. शहरी लोकांना ग्रामीण संस्कृती आणि ताज्या फळांची चव चाखायला मिळत असल्याने हे केंद्र लोकप्रिय झाले आहे.

आठ एकराच्या शेतीमधून विविध प्रकारची शेती करून छाया वेखंडे यांना कृषी अधिकारी दिनेश कोळी, उप कृषी अधिकारी शशिकांत गोसावी, सचिन केणे, किरण शिंदे यांनी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देत आहेत. शेतीमध्ये विविधता असेल, तर नैसर्गिक आपत्ती किंवा बाजारभावातील चढ-उतार शेतकऱ्याचे कंबरडे मोडू शकत नाहीत. एका बाजूला भाजीपाला, दुसऱ्या बाजूला मत्स्यपालन, तिसऱ्या बाजूला फळबाग आणि या सर्वांना पर्यटनाची दिलेली जोड महत्वाची आणि आजुबाजूच्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणारी ठरत आहे.

# चवदार तळ्याला येणार झळाळी

## सुशोभिकरणासाठी ५५ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता

**| महाड | प्रतिनिधी |**

ऐतिहासिक चवदार तळे व परिसरातील सुशोभीकरणासाठी सामाजिक न्याय विभागाने ५५ कोटी ८० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे. यामुळे चवदार तळ्याला आता नवी झळाळी येणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य आणि चवदार तळे सत्याग्रहाचा आगामी शतक महोत्सव लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

महाड येथील चवदार तळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यतेविरोधात लढा देत २० मार्च १९२७ ला सत्याग्रह केला होता. या सत्याग्रहाची नोंद जागतिक पातळीवर घेण्यात आली. महानगरपालिकेकडून यापूर्वी १९८९ मध्ये चवदार तळ्याचे सुशोभीकरण करण्यात आले. परंतु, यानंतर चवदार तळ्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी विशेष तरतूद नसल्याने अनेक अडचणी येत आहेत. परंतु, आता बाबासाहेब यांच्या १२५ व्या जयंती व चवदार तळे सत्याग्रहाचा शतक महोत्सव यांचे औचित्य साधून सामाजिक न्याय विभागाने सुशोभिकरणाचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, चवदार तळे येथे दरवर्षी लाखो अनुयायी चवदार तळे सत्याग्रह स्मृतिदिन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महापरिनिर्वाण दिन यानिमित्ताने भेट देत असतात. याशिवाय या ठिकाणी हजारो पर्यटक व शालेय सहली देखील येत असतात. या पार्श्वभूमीवर निधीमुळे तळ्याचे सुशोभीकरण होऊन नवी झळाळी प्राप्त होणार आहे.तळ्याच्या परिसरातील विकास कामांसाठी ५५,७९,८५,६५३ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली आहे. या निधीमधून करण्यात येणारी कामे महाड नगर परिषदेचे मार्फत केली जाणार आहे.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत बैठक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी होणाऱ्या कार्यक्रमानिमित्त विविध समाजातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, यासाठी पनवेल महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्यमंत्री कार्यालयाचे समन्वयक डॉ. रीतेश पाटील आणि सहकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

या बैठकीस शीख, बंजारा, लबाना, मोहियाल, वारकरी संप्रदाय, सिंधी, सिकलकरी समाजातील प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते.यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी हिंद-दी-चादर कार्यक्रमाबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

सर्व समाजबांधवांचा, समाजातील सर्व गटांचा कार्यक्रमासाठी सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने चर्चा झाली. या कार्यक्रमासाठीचा वाहतूक मार्ग, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था, कार्यक्रमाची प्रचार प्रसिद्धी इत्यादी विषयांवर यावेळी चर्चा झाली.

मुख्यमंत्री कार्यालयाचे समन्वयक डॉ. रीतेश पाटील यांनी देखील उपस्थित समाजाच्या प्रतिनिधींना हिंद-दी-चादर कार्यक्रमाबाबत मार्गदर्शन व चर्चा केली.

# वाहतूक पोलिसांची बाईक रॅली

**| पनवेल | प्रतिनिधी |**

शहरात रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांबद्दल जनजागृती करण्यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलीस आणि भावना ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने कार आणि बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

ही रॅली नवी मुंबई वाहतूकपोलीसविभागाच्यावरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहिनी लोखंडे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच राजेश शहा, अपर्णा शहा, हर्षित शहा आणि अंकिता शहा यांची या सोहळ्याला विशेष उपस्थिती होती. या रॅलीमध्ये सहभागी झालेले सर्व बाईक स्वार हेल्मेट परिधान करून शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले होते.


**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# शिवकालीन वस्तूंचे प्रदर्शन

**श्रीवर्धन** : शिवरुद्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्याच असलेल्या शिवरुद्र अकॅडमी तर्फे श्रीवर्धन नगरपरिषद शाळा क्रमांक १ च्या टेरेस वरती विविध शिवकालीन हत्यारे, गडकिल्ल्यांची कुलपे व चाव्या त्याचप्रमाणे युद्धात वापरल्या जाणाऱ्या इतर वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. शिवजयंतीचे औचित्य साधून शिवरुद्र अकॅडमीचे संस्थापक शैलेंद्र गंगाराम ठाकूर यांनी हा स्तुत्य उपक्रम श्रीवर्धन येथे आयोजित केला होता. या सर्व हत्यारांचे प्रदर्शन पाहण्यासाठी श्रीवर्धनचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष अतुल चौगुले, उपनगराध्यक्ष अनंत गुरव यासह विविध शालेय विद्यार्थ्यांनी सदर प्रदर्शनाचा लाभ घेतला व हत्यारंबाबत माहिती करून घेतली.

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-लिलाव अधिसूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे तर्फे वाणिज्यिक करारांचा ई-लिलाव, आयआरईपीएस ई-टेंडरिंग प्रणालीवर खालील कार्यक्रमानुसार प्रकाशित करण्यात आला आहे.

| अ.क्र. | कराराचे नाव | करार/लॉटची संख्या | ई-लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | गाड्यांच्या आतील भागात जाहिरातींचे प्रदर्शन – मडगाव – मंगळुरू सेंट्रल – मडगाव (10107/10108) मेमू गाडी तसेच दिवा – सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106) | 02 | 28/02/2026 रोजी 11:00 वा. |
| 2 | मडगाव स्थानकावर पार्सल स्कॅनर | 01 | 28/02/2026 रोजी 11:00 वा. |
| 3 | कणकवली रेल्वे स्थानकावर एसी लाउंजचे संचालन व व्यवस्थापन | 01 | 28/02/2026 रोजी 11:00 वा. |
| 4 | गाड्यांच्या बाह्य भागावर जाहिरातींचे प्रदर्शन – दिवा – सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106), दिवा – रत्नागिरी पॅसेंजर (50104/50103), कोकण कन्या एक्सप्रेस (20112/20111), मांडवी एक्सप्रेस (10104/10103) | 03 | 02/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 5 | सिंधुदुर्ग, गोकर्ण रोड, बारकूर स्थानकांवर पे पार्किंग | 03 | 02/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 6 | एसएलआर लीजिंग – गाडी क्रमांक 11004, 20112, 10104, 22907, 56615-II | 05 | 02/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 7 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिज जवळ होर्डिंगद्वारे जाहिरात – महाराष्ट्र | 07 | 03/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 8 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमाळी, गोकर्ण रोड, होन्नावर, भटकल तसेच सुरतकल स्थानकांवर डिजिटल लॉकरची स्थापना | 08 | 03/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 9 | सिंधुदुर्ग, थिविम, करमाळी, मडगाव, कारवार, अंकोला, मुकांबिका रोड बैंदूर, अस्नोटी, मुल्की, गोकर्ण रोड, कुंदापूर तसेच सुरतकल स्थानकांवर जाहिरात फलक व होर्डिंगद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात | 12 | 04/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 10 | आडवली, विलवडे, राजापूर रोड तसेच करमाळी स्थानकांवर फेअर रिपीटरची स्थापना | 04 | 05/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 11 | माणगाव, खेड, संगमेश्वर रोड, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिविम तसेच करमाळी स्थानकांच्या फूट ओव्हर ब्रिज (एफओबी) वर जाहिरात फलकाद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात | 08 | 06/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 12 | चिपळूण तसेच करमाळी स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे वाणिज्यिक प्रसिद्धी | 02 | 07/03/2026 रोजी 11:00 वा. |
| 13 | रत्नागिरी, करमाळी, थिविम, मडगाव (प्लॅटफार्म-6), कुंदापूर तसेच मुकांबिका रोड बैंदूर स्थानकांवर पे अँड यूज शौचालय सुविधा | 06 | 07/03/2026 रोजी 11:00 वा. |

**चौकशीसाठी संपर्क करा : 1.** श्री प्रविण डावरे, मो. क्र. 9004470597. **2.** श्री विनय गावंकर, मो. क्र. 9004476129. **3.** श्री मधुकुमार शेट्टी, मो. क्र. 9004476082. अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** संकेतस्थळास भेट द्या.

### जाहीर सूचना

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **जाहिद अझीम तापिया** यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या गाव झिराडपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील (१) गट क्र. ५३, क्षेत्रफळ ००एच-४६आर-६०पी आणि (२) गट क्र. ५४/२, क्षेत्रफळ ००एच-१८आर-००पी, च्या दोन्ही शेतकी जमीन, दायासी आणि मैदानाच्या (यात यानंतर '**सदर जमीन**' असा उल्लेख करण्यात आलेला आहे) संबंधातील हक्क विलेखांची चौकशी करीत आहोत.

सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट-भाडेदारी, संमती नि परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, धारणाधिकार, परीरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था,/ तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा न्यायालयीन आदेश, करार/ करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत पाठींबा देणाऱ्या सर्व नोटरी केलेल्या दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर त्यांचा अधित्याग/ परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट :**
**(सदर जमिनीचे वर्णन)**

गाव - झिराडपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील शेतकी जमीन, दायासी किंवा मैदानाचा तो सर्व तुकडा आणि भाग :

(१) गट क्र. ५३, क्षेत्रफळ ००एच -४३आर-३०पी आणि एफ. एल. ००एच-०३आर-३० पी, एकूण ०० एच-४६आर-६०पी, ज्याचे मूल्यांकन रु. १०.०५ आहे आणि खालील प्रमाणेसिमित आहे.

उत्तर दिशेकडे : झिरडपाडा गावातील गट क्र. ५४/२ आणि गट क्र. ५५

दक्षिण दिशेकडे : झिरडपाडा गावातील गट क्र. ५२

पूर्व दिशेकडे : झिरडपाडा गावातील गट क्र. ६० आणि गट क्र. ५२

पश्चिम दिशेकडे : झिरडपाडा गावातील गट क्र. ५२

(२) गट क्र. ५४/२, क्षेत्रफळ ००एच-१८ आर-००पी आणि, ज्याचे मूल्यांकन रु. ४.१८ आहे आणि खालीलप्रमाणे सिमित आहे.

उत्तर दिशेकडे : झिरडपाडा गावातील ग्राम रस्ता आणि गट क्र. ५४/१

दक्षिण दिशेकडे : झिरडपाडा गावातील गट क्र. ५३

पूर्व दिशेकडे : झिरडपाडा गावातील गट क्र. ५५ आणि गट क्र. ६५

पश्चिम दिशेकडे : झिरडपाडा गावातील गट क्र. ५४/१ आणि गट क्र. ५२

**आज दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६**

**नेहा सेहेगल**
**भागिदार,**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट,
जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई-४०००२१

### जाहीर सूचना

या द्वारे सूचना देण्यात येते की श्री नैनीश पारेख (या पुढे "मालक" म्हणून संबोधले जाणारे) यांचे ३०,००० क्षेत्रफळाचे प्लॅट क्र. २८ वर अंदाजे २२०० चौरस फुट क्षेत्रफळाचे फार्म हाऊस यासह पाणी साठवण्याची टाकी आहे जे गाव कलोटे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड - ४१०२०२ येथे आहे आणि त्यांच्याकडे ५०/- (पन्नास) रुपयांचे ५ (पाच) इक्विटी शेअर्स ज्यांचे विशिष्ट क्र.१४६ ते १५० (दोन्ही समाविष्ट) आहेत जे शेअर सर्टिफिकेट क्र.३० दिनांक १२.०३.१९९२ अंतर्गत मेसर्स वृंदावन ट्री प्लांटेशन (सोशल अपलिफट) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी जारी केले आहेत (यापुढे"सदर मालमत्ता" म्हणून संबोधले जाणारे) ते खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक स्पष्टपणे वर्णन केलली सदर मालमत्ता विक्री/हस्तांतरण करण्याची वाटाघाटी करत आहेत.

सर्व व्यक्तिं ज्यांचे सदर मालमत्तेवर किंवा विरुध्द आणि/किंवा त्याचा कोणत्याही भागावर आणि/किंवा सदर विक्रेता/हस्तांतरणकर्त्या विरुध्द संबंधित कोणताही अधिकार, मालकी हक्क, दावा, किंवा मागणी मग ते विक्री, देवाण घेवाण, गहाणखत, धारणाधिकार, शुल्क, भेट, ट्रस्ट, ताबा, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, सुविधा, वापर, भाडेकरार, उप-भाडेकरार, सबटेनन्सी, परवाना, करार, लिस पेंडन्स, किंवा कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा असो त्यांना नोटरीकृत कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय मेसर्स इसरानी लॉ चेम्बर्स, ॲडव्होकेट्स् आणि सॉलिसिटर्स, येथे ह्या प्रसिध्दीचा तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कळवण्याची विनंती केली जाते, असे न केल्यास आक्षेप, दावे किंवा मागण्या जर असतील तर, ते सोडून देण्यात आले आहे आणि / किंवा त्याग केले आहे असे मानले जाईल आणि आमच्या अशिलांद्वारे सदर मालमत्तेची विक्री कोणत्याही आक्षेप, दावे किंवा मागण्याचा संदर्भ न घेता पूर्ण केली जाईल.

**मालमत्तेची अनुसूची**

गाव कलोटे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड - ४१०२०२ येथे असलेल्या ३०,००० क्षेत्रफळाचे प्लॉट क्र. २७ वर अंदाजे ५०० चौरस फुट क्षेत्रफळाचे फार्म हाऊस यासह पाणी साठवण्याची टाकी आहे आणि ५०/- (पन्नास) रुपयांचे ५ (पाच) इक्विटी शेअर्स ज्यांचे विशिष्ट क्र.१४६ ते १५० (दोन्ही समाविष्ट) जे शेअर सर्टिफिकेट क्र.३० दिनांक १२.०३.१९९२ अंतर्गत मेसर्स वृंदावन ट्री प्लांटेशन (सोशल अपलिफट) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी जारी केले आहेत चे सर्व अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध.

या जमिनीच्या प्लॉट सीमा :

उत्तरेस: सोसायटीच्या प्लॉट क्र.२९

पूर्वेस : सदर सोसायटीच्या ९.०० मीटर रुंद रसत्याने, ज्याच्या पलीकडे सोसायटीचा प्लॉट क्र.८

दक्षिणेस : सदर सोसायटीच्या प्लॉट क्र.२७, ज्याच्या पलीकडे सोसायटीचा प्लॉट क्र.२४

पश्चिमेस : सदर सोसायटीच्या ९.०० मीटर रुंद रसत्याने, ज्याच्या पलीकडे सोसायटीचा प्लॉट क्र.२५

२३ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिनांकित.

**मेसर्स एसडी इसरानी लॉ चेम्बर्स**
ॲडव्होकेट्स् आणि सॉलिसिटर्स (युके)
३२२, तुलसीयानी चेंबर्स, तिसरा मजला,
फ्री प्रेस जनरल रोड, नरिमन पोइंट,
मुंबई - ४०० ०२१

### जाहीर सूचना

या द्वारे सूचना देण्यात येते की श्री नैनीश पारेख (या पुढे "मालक" म्हणून संबोधले जाणारे) यांचे ३३,००० क्षेत्रफळाचे प्लॅट क्र. २७ वर अंदाजे ५०० चौरस फुट क्षेत्रफळाचे फार्म हाऊस आहे जे गाव कलोटे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड - ४१०२०२ येथे आहे आणि त्यांच्याकडे ५०/- (पन्नास) रुपयांचे ५ (पाच) इक्विटी शेअर्स ज्यांचे विशिष्ट क्र.८६ ते ९० (दोन्ही समाविष्ट) आहेत जे शेअर सर्टिफिकेट क्र.१८ दिनांक १२.०३.१९९२ अंतर्गत मेसर्स वृंदावन ट्री प्लांटेशन (सोशल अपलिफट) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी जारी केले आहेत (यापुढे"सदर मालमत्ता" म्हणून संबोधले जाणारे) ते खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक स्पष्टपणे वर्णन केलली सदर मालमत्ता विक्री/हस्तांतरण करण्याची वाटाघाटी करत आहेत.

सर्व व्यक्तिं ज्यांचे सदर मालमत्तेवर किंवा विरुध्द आणि/किंवा त्याचा कोणत्याही भागावर आणि/किंवा सदर विक्रेता/हस्तांतरणकर्त्या विरुध्द संबंधित कोणताही अधिकार, मालकी हक्क, दावा, किंवा मागणी मग ते विक्री, देवाण घेवाण, गहाणखत, धारणाधिकार, शुल्क, भेट, ट्रस्ट, ताबा, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, सुविधा, वापर, भाडेकरार, उप-भाडेकरार, सबटेनन्सी, परवाना, करार, लिस पेंडन्स, किंवा कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा असो त्यांना नोटरीकृत कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय मेसर्स इसरानी लॉ चेम्बर्स, ॲडव्होकेट्स् आणि सॉलिसिटर्स, येथे ह्या प्रसिध्दीचा तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कळवण्याची विनंती केली जाते, असे न केल्यास आक्षेप, दावे किंवा मागण्या जर असतील तर, ते सोडून देण्यात आले आहे आणि / किंवा त्याग केले आहे असे मानले जाईल आणि आमच्या अशिलांद्वारे सदर मालमत्तेची विक्री कोणत्याही आक्षेप, दावे किंवा मागण्याचा संदर्भ न घेता पूर्ण केली जाईल.

**मालमत्तेची अनुसूची**

गाव कलोटे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड - ४१०२०२ येथे असलेल्या ३३,००० क्षेत्रफळाचे प्लॉट क्र. २७ वर अंदाजे ५०० चौरस फुट क्षेत्रफळाचे फार्म हाऊस आणि ५०/- (पन्नास) रुपयांचे ५ (पाच) इक्विटी शेअर्स ज्यांचे विशिष्ट क्र.८६ ते ९० (दोन्ही समाविष्ट) जे शेअर सर्टिफिकेट क्र.१८ दिनांक १२.०३.१९९२ अंतर्गत मेसर्स वृंदावन ट्री प्लांटेशन (सोशल अपलिफट) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी जारी केले आहेत चे सर्व अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध.

या जमिनीच्या प्लॉट सीमा :

उत्तरेस: सोसायटीच्या प्लॉट क्र.२८

पूर्वेस : सदर सोसायटीच्या ९.०० मीटर रुंद रसत्याने, ज्याच्या पलीकडे सोसायटीचा प्लॉट क्र.८

दक्षिणेस : सदर सोसायटीच्या ९.०० मीटर रुंद रसत्याने, ज्याच्या पलीकडे सोसायटीचा प्लॉट क्र.२४

पश्चिमेस : सदर सोसायटीच्या ९.०० मीटर रुंद रसत्याने, ज्याच्या पलीकडे सोसायटीचा प्लॉट क्र.२५

२३ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिनांकित.

**मेसर्स एसडी इसरानी लॉ चेम्बर्स**
ॲडव्होकेट्स् आणि सॉलिसिटर्स (युके)
३२२, तुलसीयानी चेंबर्स, तिसरा मजला,
फ्री प्रेस जनरल रोड, नरिमन पोइंट,
मुंबई - ४०० ०२१

### जाहीर सूचना

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **तेहसीन दाउद उल्दे** यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मौजे साईगाव, तालुका मुरुड, जिल्हा रायगड येथील (१) गट क्र. २९०, क्षेत्रफळ ००एच -९१ आर-००पी आणि (२) गट क्र. ३०३, क्षेत्रफळ ०१एच - १३आर-००पी या दोन्ही शेतकी जमीन, दायासी आणि मैदानाच्या संबंधातील अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत. यात यानंतर '**सदर जमीन**' असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट- भाडेदारी, संमती नि परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, धारणाधिकार, परीरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था,/ तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा न्यायालयीन आदेश, करार/ करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत पाठींबा देणाऱ्या सर्व नोटरी केलेल्या दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर त्यांचा अधित्याग/ परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट :**
**(सदर जमिनीचे वर्णन)**

मौजे - साईगाव, तालुका मुरुड, जिल्हा रायगड येथील शेतकी जमीन, दायासी किंवा मैदानाचा तो सर्व तुकडा आणि भाग :

(१) गट क्र. २९०, क्षेत्रफळ ००एच-८२ आर-००पी (एच-आर-पी) आणि एफ. एल.००एच-०९ आर-००पी, एकूण क्षेत्रफळ ००एच-९१आर-००पी आणि ०.७८ रुपयाने मूल्यांकन केलेले आणि खालीलप्रमाणे सिमित असलेले :

उत्तर दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. २८४

दक्षिण दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. ३०३

पूर्व दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. २९१

पश्चिम दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. ३०४

(२) गट क्र. ३०३, क्षेत्रफळ ०१एच०३ आर-००पी (एच-आर-पी) आणि एफ.एल.०० एच-१०आर-००पी, एकूण क्षेत्रफळ ०१एच-१३आर-००पी आणि ०.९४ रुपयाने मूल्यांकन केलेले आणि खालीलप्रमाणे सिमित असलेले :

उत्तर दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. २९०

दक्षिण दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. २९५/१

पूर्व दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. २९१, ३०१ आणि ३०२

पश्चिम दिशेकडे : मौजे साईगाव गावातील गट क्र. ३१०

**आज दिनांक २३ फेब्रुवारी २०२६**

**नेहा सेहेगल**
**भागिदार,**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट,
जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई-४०००२१

विनायक दळवी

## झिम्बाब्वेचा माईक ब्रेअर्ली सिकंदर रझा



यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत झिंबाब्वेता संघ अन्य संघांपेक्षा वेगळा वाटतो. या संघाबद्दल स्पर्धेआधी कुणाला अशा किंवा अपेक्षा नव्हती. सुपरहिटमध्ये हा संघ  दाखल होईल असं सांगणारा त्यावेळी कुणीही नव्हतं. आज मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर दस्तूरखुद्द सिकंदर रझाने उपस्थित पत्रकारांना प्रश्न केला, तुमच्यापैकी कोणाला झिम्बाब्वेचा संघ उपांत्य फेरी गाठेल अस वाटतं? फक्त एक हात वर आला. सिकंदर हसत म्हणाला, ही गोष्ट आम्हाला आणि मला, आमच्या संघाला चांगली कामगिरी करण्यासाठी प्रवृत्त करते. कोणाकडूनही अपेक्षांचा दडपण नाही अशा वेळी मुक्तपणे खेळणं आणि दर्जेदार कामगिरी करणं सोपं असते. मी, या स्पर्धेत आलो त्यावेळी देखील कोणी सुपरएट प्रवेशाची संधी आम्हाला दिली नव्हती. आमच्या गटात सर्व कसोटी खेळणारे संघ होते. त्या सर्वांना हरवून आम्ही गटात अग्रस्थान मिळून दाखल झालो. तरी आम्हाला अजून कोणीही यापुढील मजल मारणार संघ म्हणून पाहत नाही. तुम्हा सर्व प्रसिद्ध माध्यमच्या प्रतिनिधींची आमच्या संघाबद्दलची बदललेली मतं मला पहायची आहेत.त्यावेळी मला तुम्हाला सामोरे जायला आवडेल.

श्रीलंकेतील मैदान, परिस्थिती हवामान आणि भारतातील परिस्थिती यात फरक असला तरीही, त्या सर्व गोष्टी दूर ठेवून आम्ही फक्त क्रिकेटवर लक्ष केंद्रित केल आहे. सिकंदर एम याच्या गाठीशी प्रचंड अनुभव आहे.  त्या अनुभवाचा फायदा त्याला झिंबावे संघाचा नेतृत्व करताना होताना दिसतोय. सध्याच्या क्रिकेटमध्ये जे कर्णधार आहेत, त्या सर्व कर्णधारांमध्ये सिकंदरला सर्वात धूर्त कर्णधार  असं संबोधलं जाते. झिंबाब्वे संघाचा तो माईक ब्रेअर्ली आहे असे म्हणतात. त्याचे कारण प्रत्येक प्रतिस्पर्धी संघाचा आणि त्या संघातील खेळाडूंचा वैयक्तिकरित्या अभ्यास त्यांने केलेला आहे. त्यानुसार प्रत्येकासाठी वेगवेगळी रणनीती आखली जाते. याबाबत बोलताना सिकंदर म्हणत होता, मी आणि माझे सहकारी जेव्हा जेव्हा परदेशात विविध साखळी स्पर्धा लिग खेळायला जातो. त्यावेळी तेथील खेळाडू मैदाने आणि अनुभव आमच्या संघातील खेळाडूंची 'शेअर' करत असतो. त्याचा फायदा खेळाडूंना निश्चितच होत आहे.

सिकंदर आतापर्यंत जवळजवळ २५ जून अधिक लीग संघांसाठी खेळला आहे. त्याच्या गाठीशी मर्यादित षटकांचे क्रिकेट खेळण्याचा प्रचंड अनुभव आहे. आणि तोच आता संघाला सध्या उपयोगाला येत आहे.खरंतर सिकंदर निवृत्तीच्या जवळ आहे तो ३९ वर्षाचा आहे. तरी देखील त्याचा अनुभव पाहता त्याची भूमिका कदाचित प्रशिक्षकाच्या स्वरूपात बदलू शकेल. सियालकोटचा सिकंदर रझा फायटर पायलट बनू इच्छित होता. त्याने पाकिस्तान एअर-फोर्स कॉलेजमध्ये स्थान मिळवले. परंतु डोळ्यांच्या चाचणीत अपयशी ठरल्यानंतर, त्याने व्यावसायिक क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली आणि झिम्बाब्वेला गेला, जिथे त्याचे पालक २००२ पासून राहत होते. त्याने २००७ मध्ये नॉर्दर्नसाठी लोगान कपमध्ये प्रथम श्रेणी पदार्पण केले आणि २०१०-११ च्या हंगामात त्याने पूर्णवेळ क्रिकेटचा अभ्यास पूर्ण करण्यापूर्वी त्या हंगामात चार सामने खेळले-सदर्न रॉक्ससाठी त्याच्या पहिल्या दोन सामन्यांमध्ये दोन अर्धशतके आणि एक शतक ठोकले.

मे २०१३ मध्ये त्याने झिम्बाब्वेसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले, बांगलादेश आणि भारताविरुद्ध व्हाईट बॉल मालिका खेळली आणि त्यानंतर घरच्या मैदानावर पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात ६० धावा केल्या. या सामन्यात झिम्बाब्वेने पहिल्या डावात मोठी आघाडी घेतली होती. त्याचे रूपांतर विजयात करू शकला नाही. पुढच्या वर्षी त्याने बुलावायो येथे अफगाणिस्तानविरुद्ध १४१ धावा करत पहिले एकदिवसीय शतक झळकावले. २०१५ च्या एकदिवसीय विश्वचषकात तो पहिल्यांदा पाकिस्तानविरुद्ध खेळला आणि नंतर लाहोरमध्ये त्यांच्याविरुद्ध द्विपक्षीय सामन्यात शतक झळकावले. २०१६ मध्ये झिम्बाब्वेने श्रीलंकेला हरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली-परदेशात पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत त्यांचा पहिला विजय. २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या पात्रता स्पर्धेत प्लेअर ऑफ द टूर्नामेंट असूनही रझाला झिम्बाब्वे संघात स्थान मिळाले नाही, ज्यासाठी संघाला स्थान मिळाले नाही.

२०२१ मध्ये तो अस्थिमज्जेच्या संसर्गावर मात करून परतला आणि २०२२ च्या टी२० विश्वचषक पात्रता सामन्याच्या अंतिम फेरीत नेदरलँड्सविरुद्ध ८ धावांत ४ बळी घेत गोलंदाजी करणाऱ्या गोलंदाजीचा तो सामनावीर ठरला. मुख्य स्पर्धेत झिम्बाब्वेने आयर्लंड आणि पाकिस्तानला हरवल्यानंतर त्याने सामन्याचे पुरस्कारही जिंकले. ते वर्ष त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात यशस्वी वर्ष होते, त्याने १३८० व्हाईट-बॉल धावा केल्या आणि २०२३ मध्ये तो ३७ वर्षांच्या वयात झिम्बाब्वेचा टी२० कर्णधार बनला. रझा टी२० मध्ये तत्परतेने खेळला जेव्हा हा फॉरमॅट भरभराटीला आला. त्याने बीपीएल आणि आयपीएलमध्ये अनेक हंगाम खेळले. आयएलटी २० मध्ये दुबई कॅपिटल्स, सीपीएलमध्ये ट्रिनबागो नाईट रायडर्स आणि पीएसएलमध्ये लाहोर कलंदर्ससोबत दोनदा जेतेपद जिंकले.

# भारतीय महिलांचा ऑस्ट्रेलियावर विजय

■ तिसऱ्या सामन्यात १७ धावांनी केला पराभव

■ मालिका २-१ अशी टाकली खिशात

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय महिला संघ आणि ऑस्ट्रेलिया महिला संघ यांच्यातील तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवण्यात आली होती. या मालिकेतील तिसरा आणि निर्णायक सामना ॲडलेडमध्ये खेळला गेला. या सामन्यात भारतीय महिलांनी ऑस्ट्रेलिया महिला संघाचा १७ धावांनी पराभव केला. या विजयासह, भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियामध्ये मालिका २-१ अशी आपल्या खिशात टाकली. तसेच, या मालिका विजयाने त्यांची दुसरी टी-२० मालिका जिंकण्यात यश मिळवले. यापूर्वी, भारतीय महिला संघाने २०१५-०१६ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये टी-२० मालिका जिंकली होती.

ॲडलेडमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात, भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना, भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. भारतीय संघाला पहिला धक्का शेफाली वर्माच्या रूपात बसला, ती १९ धावांवर ७ धावांवर बाद झाली. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिज यांनी ८२ चेंडूत दुसऱ्या विकेटसाठी १२१ धावांची भागीदारी रचत संघाला मजबूत स्थितीत पोहचवले आणि विजयाचा पाया रचला.

प्रत्युत्तरादाखल, भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलियाची सुरुवात देखील निराशाजनक राहिली. ऑस्ट्रेलियाला १९ धावांवर पहिला झटका बसला. जॉर्जिया वॉल १० धावांवर बाद झाली. बेथ मूनी देखील खास काही करू शकली नाही.  ती ६ धावा करून बाद झाली. आपला ३५० वा सामना खेळणरी एलिस पेरी १ धावा करून माघारी गेली. ऑस्ट्रेलिया संघाने ३२ धावांवर आपले महत्वाचे तीन बळी गमावले. त्यानंतर फोबी लिचफिल्ड आणि ॲशले गार्डनर यांनी मिळून डाव सावरला. पण लिचफिल्ड २६ धावांवर बाद झाली. त्यानंतर जॉर्जिया वेअरहॅमने १२ धावा करून माघारी गेली. ॲनाबेल सदरलँडने १४ धावा केल्या. ॲशले गार्डनर एका बाजूने टिकून होती. तिने तिचे अर्धशतक पूर्ण केले. ती ५७ धावा करून बाद झाली. ऑस्ट्रेलियाचा संघ २० षटकांत ९ बळी गमावून फक्त १५९ धावा करू शकला. परिणामी १७ धावांनी पराभव स्वीकारावा लगाला. भारताकडून श्रेयंका पाटीलने ३, श्री चरणीने ३, अरुंधती रेड्डीने २ आणि रेणुका सिंग ठाकूरने १ विकेट घेतली.



### स्मृतीची स्फोटक खेळी

स्मृती मानधना यांनी आपले अर्धशतक पूर्ण केले. ती शतक झळकवेल असे वाटत असताना ती ८२ धावांवर माघारी गेली. ५५ चेंडूंच्या तिच्या खेळीत स्मृती मानधनाने ८ चौकार आणि ३ षटकार लगावले. जेमिमा रॉड्रिज ४६ चेंडूत ५९ धावांवर पव्हेलियनमध्ये परत गेली. या खेळीत तिने ४ चौकार लगावले. यष्टिरक्षक रिचा घोषने ७ चेंडूत १८ धावांची आक्रमक खेळी करून संघाची धावसंख्या वाढवली. तसेच, कर्णधार हरमनप्रीत कौर २ धावांवर नाबाद राहिली. भारताने ६ बाद १७६ धावा उभ्या केल्या. ऑस्ट्रेलियाकडून ॲनाबेल सदरलँडने २ बळी टिपले तर किम गार्थ आणि सोफी मोएलिक्स यांना प्रत्येकी १ बळी घेण्यात यश आले.

महाराष्ट्राची पोरगी चमकली; बांगलादेशवर केली मात

## भारतीय  महिलांनी जिंकला आशिया चषक

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय महिला संघाने आशिया चषक स्पर्धेच्या फायनलमध्ये बांगलादेशला पराभूत करून जेतेपदाची माळ गळ्यात पाडून घेतली. तेजल हसबनिसच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय महिला संघाने बाजी मारली. प्रेमा रावतनेही गोलंदाजीत आपली छाप सोडली.  भारतीय महिला संघाला चांगली सुरुवात करता आली नाही. ४ फलंदाज ४४ धावांत तंबूत परतल्यानंतर तेजल व कर्णधार राधा यादव ही जोडी मैदानावर उभी राहिली.



राधा व तेजल यांनी ६९ धावा जोडल्या. फाहिमा खातूनने ही जोडी तोडली. राधा ३६ धावांवर माघारी परतली. या विकेटनंतर टीम इंडियाची पडझड पुन्हा सुरू झाली. फातिमाने आणखी दोन विकेट्स घेतल्या. तेजल दुसऱ्या बाजूने किल्ला लढवत राहिली आणि तिने ३४ चेंडूंत ३ चौकार व २ षटकारांच्या मदतीने नाबाद ५१ धावांची खेळी केली. भारताला ७ बाद १३४ धावा केल्या. फहिमाने ४ विकेट्स घेतल्या.

लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या बांगलादेशला भारतीय गोलंदाजांनी धक्के दिले. प्रेमा रावतने आघाडीच्या पाचपैकी ३ खेळाडूंना बाद करून बांगलादेशची अवस्था ५ बाद ६३ अशी केली. शमिमा सुलताना ( २० ) व सर्मिन सुलताना ( १८ ) यांनी संघर्ष करण्याचा प्रयत्न केला.

राधा यादव व सैमा ठाकोर यांनी आघाडीच्या फळीला धक्का दिला. त्यानंतर मिन्नू मणी व सोनिया मेंढिया यांनी विकेट सत्र सुरू ठेवले. .बांगलादेशचा संपूर्ण संघ १९.१ षटकांत ८८ धावांत तंबूत परतला. प्रेमाने तीन, तर तनुजा कनवर व सोनिया मेंढीया यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

हरीहरेश्वर समुद्रकिनाऱ्यावर

## रंगली बैलगाडी शर्यत



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

पारंपरिक क्रीडा संस्कृतीचा जल्लोष अनुभवायला मिळाला तो मारळ-हरीहरेश्वर येथील समुद्रकिनाऱ्यावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य बैलगाडी शर्यतीत. हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीत, ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषमय वातावरणात पार पडलेल्या. या स्पर्धेत भेंडखोल गावचे स्वप्नील कोलथकर यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानाचा तुरा रोवला.

समुद्राच्या लाटांचा गजर आणि वाळूतून धावणाऱ्या बैलगाड्यांचा वेग असा रोमांचकारी संगम यावेळी पाहायला मिळाला. परिसरातील अनेक नामांकित स्पर्धकांनी सहभाग घेतल्याने स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली होती. अंतिम फेरीत स्वप्नील कोलथकर यांच्या बैलगाडीने वेग, ताकद आणि उत्कृष्ट नियंत्रण यांचा सुरेख मिलाफ साधत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले आणि विजेतेपद पटकावले.


शर्यती दरम्यान प्रेक्षकांकडून सतत घोषणाबाजी व टाळ्यांचा कडकडाट सुरू होता. विजयानंतर भेंडखोल गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला. अनेक मान्यवरांनी स्वप्नील कोलथकर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ही शर्यत केवळ क्रीडा स्पर्धा नसून कोकणातील परंपरा, शौर्य आणि शेतकरी संस्कृतीचे प्रतीक असल्याचे आयोजकांनी सांगितले. या दणदणीत यशामुळे भेंडखोल गावाचे नाव पुन्हा एकदा तालुक्यात गाजले आहे.

## सासवडमध्ये महाराष्ट्र केसरीचा थरार

| पुणे | प्रतिनिधी |

सासवड येथे प्रथमच 'महाराष्ट्र केसरी' या मातीतील कुस्ती स्पर्धा मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात येणार असल्याची माहिती कुस्ती महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस गौरव रोशनलाल (दिल्ली) यांनी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी संघाचे राज्याचे सचिव मोहन खोपडे, संघाचे राज्याचे अध्यक्ष नितीन बारणे, ऑलिंपिक पहिलवान आणि तांत्रिक अध्यक्ष ज्ञान सिंग, आयोजक प्रकाश जगताप उपस्थित होते. महाराष्ट्र शैली कुस्ती संघटनेच्या वतीने 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धा भरविण्यात येते. या संघटनेच्यावतीने



६० वर्षांपासून हिंदकेसरी, रुस्तुम-ए-हिंद, भारत केसरी यांसारख्या स्पर्धा घेतल्या जातात. सासवड येथे होणारी 'महाराष्ट्र केसरी' पहिलवान प्रकाशबापू जगताप प्रतिष्ठान, संघटनेचे सचिव पहिलवान मोहन खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असल्याचे रोशनलाल यांनी सांगितले.  स्पर्धेला ऐतिहासिक आणि भावनिक महत्त्व महाराष्ट्र केसरी होणे हे प्रत्येक पहिलवानाचे स्वप्न असते. हा किताब जिंकणारा पहिलवान केवळ विजेता राहत नाही, तर तो संपूर्ण महाराष्ट्राचा अभिमान ठरतो. त्यामुळेच या स्पर्धेला ऐतिहासिक आणि भावनिक महत्त्व आहे. त्यासाठी पहिलवान अनेक वर्षे कष्ट करतो. पहाटेचा सराव, आखाड्यातील मेहनत, शिस्तबद्ध जीवन, संयम आणि अपयशावर मात करण्याची जिद्द या सगळ्याचा शेवट ङ्गमहाराष्ट्र केसरीफच्या मैदानात होतो. ही स्पर्धा फक्त ताकदीची नसून मानसिक ताकद, अनुभव आणि डावपेचांची देखील परीक्षा असते.

## फुटबॉल सामने होणार हाऊसफुल्ल

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

फुटबॉल वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सामन्यांच्या तिकिटांसाठी जगभरातून विनंती अर्ज येत आहेत. स्पर्धेआधीच सर्व सामन्यांची तिकिटे विकली गेलेली असतील, सर्व १०४ सामने हाऊसफुल्ल होतील, असा विश्वास फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फॅंटिनो यांनी विश्वास व्यक्त केला आहे.  अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या तीन देशांमध्ये संयुक्तपणे ११ जून ते १९ जुलै या कालावधीत आयोजित केलेल्या या स्पर्धेसाठी फुटबॉलप्रेमींमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे.

## 'स्पोर्ट्स गव्हर्नन्स ॲक्ट'ला मंजुरी

**पुणे:** क्रीडा संघटनांमधील अंतर्गत वाद आणि अनियमितता दूर करण्यासाठी केंद्र सरकार स्पोर्ट्स गव्हर्नन्स ॲक्ट आणत असून, खेळाडूंच्या निवड प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी राष्ट्रीय व राज्य स्तरावरील सर्व स्पर्धांचे चित्रीकरण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी माध्यमांना दिली. अनेकदा संघटनांमधील वादांमुळे प्रकरणे न्यायालयात प्रलंबित राहतात, यात गुणवंत खेळाडूंचे मोठे नुकसान होते. नवीन कायदा या सर्व समस्यांना पायबंद घालण्यासाठी प्रभावी ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

एमसीए वरिष्ठ गटाच्या क्रिकेट स्पर्धेत

## रायगड, नाशिक, वायएमसीए संघांचा विजय

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या पुरुषांच्या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या झालेल्या सामन्यात रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन,नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन व वायएमसीए क्रिकेट क्लब पुणे संघानी विजय मिळवला आहे. रायगड विरुद्ध सेंट्रल झोन या संघामध्ये झालेल्या सामन्यात रायगडच्या संघाने सेंट्रल झोन संघाचा एक डाव व ६० धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. प्रथम फलंदाजी करतांना सेंट्रल



झोनच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद १०६ धावा काढल्या. रायगडचा अभिषेक खातू यांनी ८ फलंदाजांना बाद करत तंबूत धाडले. रायगडच्या संघाने पहिल्या डावात ९ गडी गमावत ३१२ धावांवर डाव घोषीत केला. रायगडचा कर्णधार रवी सोलंकी यांनी ५१ तर श्रेयस कुमार यांनी ४१ धावांची दमदार खेळी केली. पहिल्या डावात रायगडच्या संघाने २०६ धावांची मोठी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात सेंट्रल झोन संघाचा डाव १४६ धावांमध्ये आटोपला, कौस्तुभ म्हात्रे यांनी ४ आर्यन देशमुख ३ तर अभिषेक खातू यांनी २ फलंदाज बाद केले. रायगडच्या सामना एक डाव व ६० धावांनी जिंकला. गव्हाण उलवे झालेल्या सामन्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे संघावर एक डाव व ७५ धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. प्रथम फलंदाजी करतांना सीडीएच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी गमावत १९१ धावा केल्या, नाशिक संघाने पहिल्या डावात धावांचा डोंगर उभा करत ६ गडी गमावत ४२८ धावा काढल्या त्यामध्ये रवींद्र मॅचा यांनी १४० तर अभिजितने मधल्या फळीत खेळतांना सर्वाधिक १४० धावा काढून शतक झळकवले. दुसऱ्या डावात सीडीएचा संघ १६२ धावांमध्ये आटोपला. वायएमसीएच्या संघाने प्रथम फलंदाजी करतांना सर्व गडी बाद २८५ धावा केल्या त्यामध्ये नित्या लुनकड यांनी सर्वाधिक १२८ धावा काढून शतक झळकवले आहे. क्लब ऑफ महाराष्ट्राकडून केदार बजाज यांनी ४ गडी बाद केले. जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन केल्या बद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

उपांत्य फेरीत पोहोचणे अवघड झाले | पाऊस पडल्याने बिघडले गणित

## पाकिस्तान न्यूझीलंडविरुद्धची लढत रद्द

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यातला टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील सुपर ८ चा सामना पावसामुळे रद्द झाला. दोन्ही संघांना प्रत्येकी एका गुणावर समाधान मानावे लागले आणि हा दोन्ही संघांसाठी खूप मोठा धक्का आहे. कोलंबो येथील प्रेमदासा स्टेडियमवरील लढतीत पावसाने खोडा घातला आणि फायनलचे स्वप्न पाहणाऱ्या पाकिस्तानचे उपांत्य फेरीत पोहोचण्याचेही वांदे झालेले दिसत आहेत. आता पाकिस्तानला उपांत्य फेरीत जाण्यासाठी स्वतः सह इतरांच्या निकालावर अवलंबून रहावे लागणार आहे. पाकिस्तान, न्यूझीलंड यांच्यासह ग्रुप २ मध्ये यजमान श्रीलंका आणि इंग्लंड यांचाही समावेश आहे. पाकिस्तान व न्यूझीलंड यांचे प्रत्येकी तीन दोन सामने शिल्लक आहेत आणि तिन्ही सामने जिंकून पाच गुणांसह आगेकूच करू शकतात. पाकिस्तानला पुढील सामन्यात इंग्लंड (२४ फेब्रुवारी) व श्रीलंका (२८ फेब्रुवारी) यांचा सामना करावा लागणार आहे. पाकिस्तानने हे दोन्ही सामने जिंकले तर ते पाच गुणांसह उपांत्य फेरीत पोहोचू शकतात. या गटात त्यांच्यासह फक्त एकच संघ ५ गुणांची कमाई करू शकतो.

जर पाकिस्तानने दोनपैकी एक सामना गमावला, तर त्यांचे तीन गुण होतील. अशा परिस्थितीत त्यांना इतर निकालांवर अवलंबून रहावे लागेल. ३ गुणांसह तेही शर्यतीत राहू शकता, परंतु अशावेळी नेट रन रेट निर्णायक भूमिका बजावतील. पाकिस्तानने दोन्ही सामने गमावल्यास त्यांचे आव्हान संपुष्टात येईल.



### उपांत्य फेरीचा मार्ग

श्रीलंका वि. इंग्लंड - इंग्लंडचा विजयइंग्लंड वि. पाकिस्तान - पाकिस्तानचा विजयश्रीलंका वि. न्यूझीलंड - न्यूझीलंडचा विजयइंग्लंड वि. न्यूझीलंड - न्यूझीलंडचा विजयपाकिस्तान वि. श्रीलंका - कोणीही जिंकल्यास फरक पडणार नाहीवरील निकालानंतर न्यूझीलंडचे ५ गुण आणि पाकिस्तानचे ३ गुण होतील आणि दोन्ही संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.

## संकेतकडे महाराष्ट्र पुरुष संघाचे नेतृत्व

| मुंबई | प्रतिनिधी |

गुजरात कबड्डी असो. च्या विद्यमाने  होणाऱ्या ७२व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्र कबड्डी असो. ने आपला संघ जाहीर केला. मुंबई शहरच्या संकेत सावंत कडे संघाच्या नेतृत्वाची कमान सोपविण्यात आली. तर अ. नगरच्या आदित्य शिंदे याच्याकडे उपसंघनायकाची धुरा सोपविण्यात आली.

गुजरात, बडोदा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुल येथे दि. २४ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत हे सामने खेळविण्यात येतील. गतवर्षी कटक, ओडिसा येथे झालेल्या ७१ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाचा पंजाब कडून उप उपांत्या फेरीत पराभव झाला होता. पण संकेत सावंत यांने मुंबई शहर संघाचे नेतृत्व स्विकारल्या नंतर अ. नगर येथे झालेली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी, जळगांव येथे झालेली छत्रपती शिवाजी महाराज चषक, तसेच बारामती येथे झालेली महाराष्ट्र ऑलम्पिक कबड्डी स्पर्धा अशा एका वर्षात तिन्ही स्पर्धे त विजेतेपद मिळवून मुंबईला हॅट्रिक साधून दिली होती. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या वतीने (दि.२१) रोजी मुंबई, दादर येथील संघटनेच्या कार्यालयात या संघाला स्पर्धे करिता शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम पार पडला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)